# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १० • अंक ५ • डिसेंबर २०१६ - जानेवारी २०१७

### मुखपृष्ठाविषयी

निराकार परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात अवतरीत होऊन ज्ञान देत आहेत. ही वेळ आहे संगमयुगाची अर्थात कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांच्या संधीकाळाची वा संगमाची. शिव परमात्म्याने, ब्रह्मा मुखाद्वारे पुढील महावाक्य उच्चारून, स्वत:चा परिचय करून दिला-

निजानंद स्वरूपं शिवो ऽ हम् शिवो ऽ हम्।
ज्ञान स्वरूपं शिवो ऽ हम् शिवो ऽ हम्।
प्रकाश स्वरूपं शिवो ऽ हम् शिवो ऽ हम्।

ज्ञानसागर शिवबाबांनी सर्वप्रथम उच्चारलेली ही महावाक्य म्हणजे जणू पावन नवसृष्टीच्या स्थापनेचा शंखध्वनीच होता. आजही शुभ व पवित्र कार्याची सुरुवात शंखध्वनीनेच केली जाते. शंख हा पवित्र मानला जातो. तसेच त्याचे स्थान देव्हाऱ्यात असते. शिवबाबांनी या सृष्टीवर (भारत भूमीवर) अवतरित होऊन, जे ईश्वरीय ज्ञान (पवित्र बनण्याचे ज्ञान) दिले; त्याचेच प्रतीक हा शंख होय. मुखपृष्ठावरील चित्रात हाच भाव दर्शविण्यात आला आहे.

आपण सर्व ब्रह्मावत्स या ईश्वरीय ज्ञानाचा शंखध्वनी साऱ्या विश्वात करून, परमात्म प्रत्यक्षता करूया.

- प्रकाशक अमृतकुंभ





१. अव्यक्त स्मृतीदिवस हा श्रेष्ठतम स्मृती प्रदान करणारा दिवस... (संपादकीय) २
२. वाचकांशी हितगुज ४
३. शिवबाबांनी आपल्याला हिरो एक्टर बनवले आहे त्यामुळे कधीही आपला वेळ साधारण रितीने गमावू नका ५
४. बेहदची वैराग्यवृत्ती ६
५. जीवनाचे खरे सार-प्रेम (भाग १) ८
६. प्रकाशाकडून सकाशाकडे ११
७. ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... १४
८. सचित्र सेवावृत्त १६
९. राजयोग, त्रिनेत्री मानव आणि विज्ञान १८
१०. वास्तविकता जीवनाची २०
११. एक वैश्विक आश्चर्य..... (भाग २) २२
१२. संघर्षमय जीवनात सफलतेसाठी सकारात्मक विचारांची आवश्यकता.. २४
१३. अध्यात्म आणि महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या २५
१४. ज्ञान आणि दान (कविता) २८
१५. उपकार तुम्हारा बाबा (अनुभव) ३०
१६. ब्रह्मातनी शिव येती अवतार (कविता) ३२
१७. शांती अमोल आहे, शृंगार जीवनाचा (कविता) ३२


• फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता : बी. के. शिवाजी, संपादक - अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए - १०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. • वर्गणी पाठविण्याचा पत्ता : बी. के. गोदावरी, प्रकाशक-अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए -१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३. फोन : ०२२ - २५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.
• संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर अ‍ॅण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रू. ६५/- • आजीव सभासद वर्गणी रू. १,३००/-**

**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या - www.amrutkumbh.com**

*संपादकीय.....*

# अव्यक्त स्मृतीदिवस
## हा श्रेष्ठतम स्मृती प्रदान करणारा दिवस



**पिताश्री ब्रह्माबाबा हे साक्षात निराकार परमात्मा शिव पित्याचे साकार माध्यम; ज्यांच्याद्वारे सत्ययुगी नव सृष्टीची स्थापना प्रत्येक कल्पात होते. म्हणून 'ब्रह्माद्वारे स्थापना' असे अविनाशी गायन सर्व शास्त्रातून केले जाते.** पिताश्री ब्रह्माबाबांचे अलौकिक साकार जीवन हजारो, लाखो ब्रह्मावत्सांनी जवळून अनुभवलं. एखाद्या परिसाचा स्पर्श होताच, लोखंडाचे सोने होते तसेच पिताश्रीच्या सहवासाने त्यांच्या जीवनाचे सोने झाले. बाबांचा प्रत्येक संकल्प, प्रत्येक शब्द, त्यांच्या चेहऱ्यावरील प्रत्येक भावछटा वा हास्य त्यांच्या अलौकिक दिव्य चरित्राला अनुरूप असेच होते. त्यामागे कुठली ना कुठली ईश्वरीय कार्याची प्रेरणा वा सेवा सामावलेली असे. त्यामुळेच पिताश्री ब्रह्माबाबांचे चरित्र विश्वातील सर्व आत्म्यांसाठी शिक्षाप्रद व अनुकरणीय आहे. म्हणूनच 'ब्रह्मा वंदे जगद्‌गुरू'असे गायन केले जाते.

पिताश्री ब्रह्माबाबा हे साकार सृष्टीरूपी नाटकातील मुख्य अभिनेता असून, त्या आत्म्याची भूमिका संपूर्ण कल्पात म्हणजे सत्ययुगाच्या प्रारंभापासून ते कलियुगाच्या अंतापर्यंत असते. म्हणूनच सत्ययुग व त्रेतायुगाला 'ब्रह्माचा दिवस' तसेच द्वापरयुग आणि कलियुगाला 'ब्रह्माची रात्र' असे संबोधले जाते. अशारितीने **कलियुगाच्या अंती जेव्हा ब्रह्माची रात्र (अर्थात अज्ञानाची रात्र) संपायला येते तेव्हा पुन्हा ज्ञानसूर्य शिव परमात्मा, ब्रह्माद्वारे नवसृष्टीची पुनर्स्थापना करतात. आपणास हे जाणून अति हर्ष होईल की वर्तमान समय हा कलियुगाचा अंतिम समय असून, ज्ञानसूर्य शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण, सन १९३६ मध्ये पिताश्री ब्रह्माबाबांच्या शरीरात झाले आहे.**

सन १९३६ ते १९६९ (सुमारे ३३ वर्षे) पिताश्री ब्रह्माबाबांनी तीव्र पुरुषार्थ केला. त्याग, तपस्या व सेवा या तीन गोष्टींच्या बळावर त्यांनी संपूर्ण कर्मातीत, फरिश्ता (देवदूत) स्थिती प्राप्त केली. दि. १८ जानेवारी १९६९ रोजी त्यांनी, आपल्या नश्वर देशाचा त्याग केला व ते अव्यक्त वतनवासी फरिश्ता बनले. विश्व इतिहासात अशा प्रकारची ही एकमेव विभूती आहे; जिने ही श्रेष्ठतम फरिश्ता स्थिती प्राप्त केली आहे. तेव्हापासून ते अव्यक्त वतनवासी बनून, परमात्मा शिव पित्यासमवेत विश्वपरिवर्तनाचे अलौकिक कर्तव्य करीत आहे. यावर्षी १८ जानेवारीला त्यांचा ४८ वा दिव्य स्मृती दिवस आहे. सदरचा दिवस हा विश्वातील सर्व ब्रह्मावत्सांना, समर्थी दिवस अनुभवाला येतो. याअनुषंगाने एका कवीने म्हटले आहे-

**ब्रह्माबाबा प्रिय हे आपुले, त्यांचा अव्यक्त दिन आला ।**
**या भावांनो, या भगिनींनो, स्मृती जागृत करण्याला।।धृ।।**
**माता-पिता बनूनी, सकळा ज्ञानामृत पाजिले ।**
**गुलाब पुष्पापरी ज्यांनी, सर्व मुलांना जपले।।**
**त्या पुष्पांचा सुवास भूवरी, आजही दरवळला।**
**या भावांनो, या भगिनींनो, स्मृती जागृत करण्याला।।**

### ब्राह्मण जन्माची श्रेष्ठतम स्मृती

कलियुगाचे अंती, संगमयुगात जेव्हा आपल्याला ब्रह्मामुखाद्वारे ईश्वराने दिलेले ज्ञान प्राप्त होते, तेव्हा आपला अलौकिक दिव्य जन्म होतो. आपण ब्रह्मा मुखवंशावली ब्राह्मण (ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी) बनतो. संपूर्ण कल्पातील आपला हा सर्वश्रेष्ठ ईश्वरीय जन्म आहे. या एका जन्मात आपले सर्व संबंध एक शिवबाबांशी जुळलेले असतात. तेव्हा पारलौकिक पिता शिव परमात्मा, अहोरात्र आपला ज्ञान, गुण, शक्तींनी शृंगार करीत असतात व प्रजापिता ब्रह्माबाबा अलौकिक माता-पिता बनून आपली अलौकिक पालना करीत असतात. पिताश्री ब्रह्माबाबांच्या स्मृतीदिनी विशेष रूपाने ही श्रेष्ठतम स्मृती जागृत होते की आपण ब्रह्मा मुखवंशावली सर्वोत्तम ब्राह्मण कुलभूषण आहोत. ही स्थायी खुशी व नशा सदैव असतो. देवी-देवतांपेक्षाही ब्राह्मणांचे कुळ श्रेष्ठ आहे. याचेच गायन पुढील काव्यपंक्तीत सुंदररितीने केले आहे-

**खुशियोंभरी, जिंदगानी हमारी,**
**देवी-देवताओं से, भी है जो प्यारी**

## ब्रह्माबाबांच्या पुरुषार्थाची स्मृती

पिताश्री ब्रह्माबाबांनी आपल्या अलौकिक जीवनात जो पुरुषार्थ केला, त्यांच्या सारखा श्रेष्ठ पुरुषार्थ करून,आपल्यालाही त्यांच्यासारखे बनायचे आहे ही स्मृती, पिताश्रींच्या स्मृतीदिनी जागृत होते. 'फॉलो फादर' करण्याचा उमंग-उत्साह जागृत होतो. पिताश्रींच्या पुरुषार्थाचे विशेष पाच पैलू होते. १. संपूर्ण समर्पण- पिताश्रींनी सेकंदात तन-मन-धन व देहअभिमान यांचे शिवबाबांना संपूर्ण समर्पण केले. २. सदा आज्ञाधारक- शिवबाबांनी दिलेल्या श्रीमताचे वा आज्ञेचे पिताश्रींनी लगेचच पालन केले. मग ती आज्ञा 'स्व' पुरुषार्थाप्रति असो अथवा यज्ञाच्या पालने निमित्त असो. ३. प्रत्येक संकल्पामध्ये एकनिष्ठ-प्रत्येक संकल्पात एक शिवबाबा, दुसरा कोणी नाही; याचे प्रत्यक्ष उदाहरण पिताश्रींनी आपल्या जीवनाद्वारे प्रस्तुत केले. ४. सदा विश्वसेवाधारी- पिताश्रींनी सदैव स्वत:ला विश्वसेवाधारी समजले. एकीकडे अतिशय नम्रचित्त, विश्वसेवाधारी तर दुसरीकडे ज्ञानाची संपूर्ण ॲथॉरिटी, त्यांच्या जीवनात पहायला मिळाली. ५. योगबलाद्वारे पिताश्री कर्मबंधनमुक्त, कर्मातीत बनले.

मुख्य म्हणजे अंतिम संपूर्ण कर्मातीत स्थिती प्राप्त करण्यासाठी, पिताश्रींनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रभुस्मृती, विश्वसेवा व बेहदची वैराग्यवृत्ती या तिन्ही गोष्टींवर पूर्णत: लक्ष दिले होते. जसा पुरुषार्थ पिताश्रींनी केला, तसाच आपल्यालाही करायचा आहे. फक्त त्यांची कॉपी करायची आहे. त्यासाठी एवढंच चेक करा की जे आपले संकल्प, बोल व कर्म आहेत, ते ब्रह्मा बाप समान आहेत का? समान असतील तरच त्यांचे स्वरूप बना. अशा रितीने पिताश्री ब्रह्माबाबांना फॉलो करूया. त्यासाठी मन्सा सदा निराकारी, वाचा सदा निरहंकारी व कर्मणा सदा निर्विकारी असली पाहिजे. यावरून आपल्या लक्षात येईल की ज्ञानमार्गात मुख्य पुरुषार्थ आहे, निराकारी स्थितीत राहणे वा आत्म अभिमानी बनणे.

## ब्रह्माबाबांच्या कर्तव्यांची स्मृती

ब्रह्माबाबांच्या कर्तव्यांचे गायन आहे. 'ब्रह्माद्वारे स्थापना.' आपण ब्रह्मावत्स देखील, विश्व परिवर्तनाच्या या महान कार्यात यथाशक्ती सहयोगी बनतो. याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते. मुख्य आहेत ८ रत्न, वैजयंती माळेतील १०८ मणी तसेच मोठ्या माळेतील १६,१०८ मणी यांच्या रूपाने. अशाप्रकारे गायन योग्य बनण्यासाठी आपल्याला तीव्र पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे, याची जाणीव प्रामुख्याने अव्यक्त स्मृतीदिनी होते. ईश्वरी यज्ञाविषयी आपल्या मनात प्रेम जागृत होते. आपण यज्ञाचे रक्षक आहोत, ट्रस्टी (विश्वस्त) आहोत. ही भावना मनात उचंबळून येते.

पिताश्री ब्रह्माबाबा, ईश्वरी यज्ञाचे संपूर्ण ट्रस्टी होते. एवढा मोठा यज्ञ असूनही, पिताश्री अगदी लहान-सहान गोष्टींकडे लक्ष देत असत व यज्ञाच्या एका पैशाचेही नुकसान होणार नाही, याची काळजी घेत असत. एकदा पिताश्री, रोझी बहेन (मद्रास सेवाकेंद्र) बरोबर पांडव भवन मध्ये फेरफटका मारण्यासाठी गेले होते. भंडाऱ्यात गेल्यावर पिताश्रींनी पाहिले की तेथे एक चुल जळत होती. परंतु अद्याप भाजी मात्र कापून झाली नव्हती. तेव्हा पिताश्रींनी तेथील सेवाधारीला समजावून सांगितले की भाजी जोपर्यंत कापून होत नाही तोपर्यंत अशीच चूल पेटत राहिली तर इंधन वाया जाईल. यज्ञात आलेल्या प्रत्येक गोष्टींचा पूरेपूर सदुपयोग झाला पाहिजे. तेथून पुढे गेल्यावर रोझी बहेन पिताश्रींना म्हणाल्या, 'बाबा तुम्ही इतक्या लहान-सहान गोष्टींकडे का लक्ष देता?' तेव्हा पिताश्रींनी पुढील महावाक्य उच्चारण केले, ''बच्ची, है तो बडा यज्ञ परंतु मैं शिवबाबा का ट्रस्टी हूँ। मुझे पाई-पाई का ध्यान रखना है। जैसा मैं करूँगा, मुझे देख और भी करेंगे, इसका मुझे हमेशा ख्याल रहता है।''

**पिताश्रींच्या जीवनातून प्रेरणा प्राप्त करून, आजही हजारो, लाखो ब्रह्मावत्स ईश्वरीय सेवेसाठी समर्पित जीवन जगत आहेत. फलस्वरूप ईश्वरी सेवेचा वटवृक्ष आज संपूर्ण विश्वात पसरला आहे. पिताश्रींच्या पाऊलावर पाऊल टाकून, आपण प्रत्येकाने तीव्र पुरुषार्थाद्वारे बापसमान फरिश्ता (देवदूत)स्थिती प्राप्त केली पाहिजे.**

## ब्रह्मा बापसमान अव्यक्त फरिश्ता बनण्याची स्मृती

पिताश्री ब्रह्माबाबा आपल्या अलौकिक जीवनात, तीव्र पुरुषार्थाद्वारे अव्यक्त फरिश्ता बनले. आपल्यालाही त्यांच्यासारखे बनायचे आहे. आपण हे जाणतो की संगमयुगाचा फार थोडा कालावधी आता शेष आहे. कालचक्र तीव्र गतीने पुढे-पुढे सरकत आहे.

राजसत्ता, धर्मसत्ता, अर्थसत्ता आणि विज्ञानसत्ता विश्वाला स्थिरता देण्यासाठी निकामी ठरत आहे. आजचं जग जणू जीवघेण्या समस्यांची बाजारपेठ बनते आहे. अशावेळी खरी आवश्यकता आहे ती अशांत, बेचैन मानवी मनाला शांती देणाऱ्या शांतीदूताची; मानवाच्या द्रवित हृदयाला प्रभु अवतरणाचा सुखद संदेश देणाऱ्या देवदूताची. **वास्तविक फरिश्ता अथवा देवदूत हा स्मृती-वृत्ती-दृष्टी-कृती इत्यादींच्या विकारी मलिनतेपासून सदा मुक्त असतो. तो निर्मोही, निर्लोभी व निरहंकारी असतो. तो व्यक्ती, वस्तू, वैभव आणि पदार्थांच्या आकर्षणापासून सदा मुक्त असतो. फरिश्ता हा सर्व कर्मबंधनमुक्त, डबल लाईट (अर्थात ज्याची आत्मिक स्थिती हलकी आहे व ज्याने प्रकाशाचे शरीर धारण केले आहे) स्थिती प्राप्त असलेला, पवित्र आत्मा होय.** फरिश्ता हा सूक्ष्म व अव्यक्त असून, तो सूक्ष्म लोकचा निवासी असतो. तो उमंग-उत्साहाच्या पंखांनी सेवेच्या गगनात सदैव उडत असतो. खऱ्या अर्थाने फरिश्ता वा देवदूत हे संगमयुगातील ब्रह्मावत्सांच्या श्रेष्ठ कर्तव्याचे व दिव्य पवित्र स्वरूपाचे चित्रण व वर्णन आहे. अशी श्रेष्ठतम स्थिती बनविण्याची दिव्यप्रेरणा, पिताश्रींच्या अव्यक्त स्मृती दिनी प्रत्येक ब्रह्मावत्साला प्राप्त होते. यासाठी विशेष पुरुषार्थ करण्यासाठी, आपण दरवर्षी जानेवारी महिना हा 'स्मृतीमास' म्हणून पाळतो. या महिन्यात विशेष तपस्या करतो. या महिन्यातील ३१ दिवस जरी आपण सहज, स्वत: शक्तिशाली फरिश्ता स्थितीचा अनुभव केला तरी सदा काळासाठी तो नॅचरल संस्कार बनविण्यासाठी, मोठी गिफ्ट आपल्याला प्राप्त होईल. कारण संगमयुगाच्या या वरदानी समयी 'फरिश्ता भव' हे वरदान स्वत: परमात्मा शिव पिता सर्व ब्रह्मावत्सांना देत आहेत. त्या **अनुषंगाने दि. १६/३/९२ च्या अव्यक्त वाणीतील प्राणेश्वर बापदादांची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा- ''मीठे बच्चे, जैसे अपना स्थूल स्वरूप सदा याद रहता है वैसे अपना फरिश्ता स्वरूप सदा ही स्पष्ट सामने हो। बस अभी बने की बने। फरिश्ते थे, फरिश्ते है और कल्प-कल्प फरिश्ते हमको ही बनना है। तो हिम्मत, उमंग, उत्साह से उडते चलो।'' वर्तमान समय आहे, 'ब्राह्मण सो फरिश्ता' बनण्याचा. तसेच ब्रह्मा बाबांशी स्नेहाची निशाणी आहे- फरिश्ता बनणे. त्यामुळे यावर्षी जानेवारी महिन्यात स्मृती मासच्या निमित्त आपण विभिन्न स्मृतींची अनुभूती करून, स्मृती स्वरूप बनूया व त्या स्मृतींच्या आत्मिक नशेचा अनुभव करूया. हीच खरी पिताश्री ब्रह्माबाबांना त्यांच्या ४८व्या दिव्य स्मृती दिनानिमित्त (दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी असलेल्या) समर्पित भावपूर्ण श्रद्धांजली वा आदरांजली ठरेल. अव्यक्त स्मृतीदिनी प्रत्येकाचे मन हेच गीत गात असते.. याद तुम्हारी आती है, बाबा याद तुम्हारी आती है। मधुबन का हर कण कहता है, हम बच्चों का मन कहता है। शेवटी पुन्हा विश्वातील लाखो ब्रह्मावत्सांकडून, पिताश्री ब्रह्माबाबांच्या दिव्य स्मृतीला कोटी-कोटी प्रणाम!**

**- ब्रह्माकुमार शिवाजी**

## वाचकांशी हितगुज

- वाचकांनी तसेच सेवाकेंद्राच्या टीचर बहिणींनी एप्रिल २०१७ पासून सुरू होणाऱ्या नवीन वर्षाची 'अमृतकुंभ'ची मागणी फेब्रुवारी २०१७ अखेरपर्यंत कळवावी. म्हणजे त्यानुसार अंक छापणे सुकर होईल. विशेष बाब म्हणजे पुढील वर्षाची वर्गणी सध्या इतकीच ठेवण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रत्येकाने अधिकाधिक सभासद संख्या वाढवून ईश्वरीय सेवेचे सद्‌भाग्य जमा करावे.
- सन २०१६-१७ ची वर्गणी अद्याप थकित असल्यास, ती लवकरात लवकर प्रकाशक अमृतकुंभ यांच्या पत्त्यावर पाठविण्याचे सहकार्य करावे. तसेच डिमांड ड्राफ्ट पाठविताना, तो 'अमृतकुंभ'च्या नावानेच पाठवावा.

- प्रकाशक अमृतकुंभ

**अमृतकुंभच्या सर्व वाचकांना नववर्ष २०१७च्या हार्दिक शुभेच्छा! नुतनवर्ष आपणा सर्वांना सुख, शांतीचे व भरभराटीचे जावो, हीच मंगल कामना!**

-ब्र.कु. गोदावरी, प्रकाशक



# शिवबाबांनी आपल्याला हिरो एक्टर बनवले आहे ...
## त्यामुळे कधीही आपला वेळ साधारण रितीने गमावू नका...

- राजयोगिनी दादी जानकीजी

**संगमयुगाचा समय फारच मूल्यवान आहे. ५ मिनिट जरी आपण साधारण वर्तन केले तरी त्याचा परिणाम कल्पात ५ वर्षासाठी होतो. शिवबाबांच्या आठवणीत राहिल्याने आपल्याला करंट (शक्ती) मिळते. परंतु जर आपले वर्तन साधारण असेल तर करंट मिळणार नाही.** जसे बिना कनेक्शन लाइट मिळत नाही, मग अंधारात कसे चालाल? प्रत्येक पावलावर अडखळत चालाल. पुरुषार्थात देखील प्रत्येक जण चालत आहे. परंतु कोणी संथ पावलाच्या गतीने तर कोणी विमानाच्या तेज गतीने.

विश्व कल्याणकारी शिवबाबा, माझे पिता आहेत. माझे पिता विश्व कल्याणाचे कर्तव्य करीत आहेत. त्यामुळे चेक करा की मी काय करत आहे? खऱ्या पुरुषार्थीला दिवस-रात्र फार बळ मिळत असते. त्याला कुठलीही मेहनत वाटत नाही. कारण तो प्रेमाने चांगला पुरुषार्थ करत असतो. त्याला अतिशय खुशी प्राप्त होत असते. तसेच त्याला पुरुषार्थ अगदी सहज वाटतो. आपण खरंच खूप भाग्यवान आहोत कारण संगमयुगात स्वयं भगवान, आपल्या भविष्य २१ जन्मांचे श्रेष्ठतम प्रालब्ध बनविण्यासाठी, श्रेष्ठ पुरुषार्थ करवून घेत आहे. आपण एकटे नसून, भगवान आपला साथी आहे.



संगमयुगाचा समय अतिशय मूल्यवान आहे. आता आपण संकल्प सुद्धा सफल करत आहोत. आपल्या प्रत्येक संकल्पात शिवबाबांची स्मृती आहे. प्रत्येक पावलात स्मृती आहे. त्यामुळे आपल्या प्रत्येक पावलात कमाई होत आहे. अशाप्रकारे स्मृतिस्वरूप बनणे म्हणजे पद्मापद्म भाग्यशाली बनणे होय. ज्ञानसागर शिवबाबा आपल्याला ही स्मृती प्रदान करतात की तुम्ही देवता धर्माचे आत्मा आहात. ही स्मृती अधर्माचा नाश करते. त्यामुळे शिवबाबांच्या बरोबर आपणही पापाचार व भ्रष्टाचार समाप्त करण्याचे कार्य करीत आहोत. आपल्या सत्य स्वरूपाच्या स्मृतीनेच सत्‌धर्माची स्थापना होत आहे.

ज्ञानस्वरूप अर्थात शांत स्वरूप, पवित्र स्वरूप, प्रेम स्वरूप, आनंद स्वरूप.... हे बाबांचे मधुर महावाक्य आपण जेव्हा ऐकतो व आपल्या जीवनात धारण करतो, तेव्हा आपले जीवन हिरेतुल्य बनते. जसे हिरो एक्टरचे लक्ष नेहमी डायरेक्टरच्या इशाऱ्याकडे असते. त्याचे लक्ष जरासुद्धा इकडे-तिकडे नसते. कोणी असं का करत आहे, याचा तो विचारही करीत नाही. **त्याचे लक्ष पूर्णत: आपल्या भूमिकेकडे असते. तसेच आपण ब्रह्मावत्स देखील या सृष्टिनाटकातील हिरो एक्टर आहोत. त्यामुळे आपण आपला वेळ कधीही साधारणरितीने घालवता कामा नये. यासाठी सदैव खबरदार, सावधान रहायला हवे.**

चेक करा की आपली कर्म किती चांगली आहेत. जर ती चांगली नसतील तर दुसऱ्यांचे आशीर्वाद (दूवा) मिळणार नाहीत. जर आपण दुसऱ्याला दु:ख देत असू तर आपले जीवन तसेच मृत्यु कसा असेल ? आपला मृत्यू कसा होईल; हे आताच्या आपल्या वागण्यावरून ओळखा. आपले कर्म असे असावेत ज्याचा फायदा दुसऱ्यांना व्हावा. आता सर्वशक्तिवान परमात्मा पिता आपल्याला भेटला आहे तर आपले कर्म किती श्रेष्ठ असले पाहिजे. कारण परमात्म्याच्या नंतर कर्म मोठे बलवान आहेत. त्यामुळे आपले कर्म कधीही साधारण असता कामा नयेत. साधारणता देखील नुकसानकारक आहे. **साधारण विचार करणारा, साधारण गोष्टी करणारा... माळेचा मणी कसा बनेल? अगदी अशक्य आहे. म्हणून आपल्या जीवनात**

▶ पान १३ वर

# बेहदची वैराग्यवृत्ती

-ब्र. कु. आत्मप्रकाश भाई, शांतिवन, (आबूरोड)

वैराग्य दोन प्रकारचे असते - हदचे (थोड्या वेळापुरते) आणि बेहदचे (सदा काळचे) कटु परिस्थिती, असह्य परिस्थितीमुळे एखाद्या वस्तू किंवा व्यक्तीपासून दूर जाणं-हेच आहे. थोड्या वेळापुरते वैराग्य. उदाहरणार्थ, आजारामुळे एखादी व्यक्ती आंबट पदार्थांचा त्याग करते. त्याला आंबट पदार्थांचे वैराग्य नाही. परंतु शरीराची परिस्थिती अशी आहे की तो खाऊच शकत नाही. याला जबरदस्ती किंवा मजबूरी वश केलेला त्याग म्हटले जाते. असा त्याग काही जास्त वेळासाठी नसतो. परिस्थिती ठीक होताच, त्यागाचा अवधी ही पूर्ण होतो.

एक व्यक्ती भोजनाच्या वेळी आपल्या पत्नीशी रोज भांडण करायचा आणि धमकी द्यायचा की, जर भोजन माझ्या आवडीप्रमाणे बनविले नाही, तर संन्यासी होईन. कित्येक दिवस तर पत्नी घाबरत राहिली. त्यांचे बरे-वाईट बोल सहन करीत राहिली. एक दिवस हिंमत करून म्हणाली, ''व्हा संन्यासी!'' व्यक्तीचा अहंकार दुखावला तो एका संन्याशाच्या आश्रमात पोहोचला. आपले विचार त्याने ऐकविले. संन्यासी म्हणाला ठीक आहे आणि त्याला साफ-सफाईची सेवा दिली. दुपार झाली. त्याला खूप भूक लागली. तो म्हणाला, महाराज, आपल्यासाठी भोजन बनवू? संन्यासी म्हणाला, माझे तर आज व्रत आहे. आपण कडुलिंबाची पाने खाऊन घ्या. आम्ही तर असेही करतो. त्या व्यक्तीचे



तोंड कडुलिंबाचे नाव ऐकूनच कडू झाले आणि तो आल्यापावली घरी परत गेला. घराच्या परिस्थितीमुळे तो आश्रमाकडे वळला होता. परंतु तिथे तर घरापेक्षा ही मोठी परिस्थिती पाहून पुन्हा घरी परतला. अशा प्रकारचे वैराग्य, हे काही वैराग्य नाही. हे तर समस्यांपासून दूर जाणे आहे. एखाद्या पशूला कोणी इकडून काठी मारली तर तो तिकडे धावत जातो आणि तिकडून काठी मारली तर, इकडे धावत येतो, इच्छांमध्ये अडकलेली व्यक्तीसुद्धा पशुप्रमाणे परिस्थितींचे धक्के खात राहते.

## राग हा गुप्त आजार

काही लोक जिद्दीने, लोकलाजेखातर, अहंकारवश आपल्या त्यागावर पक्के तर राहतात, परंतु मनाने वेगळे (स्वतंत्र) होत नाहीत. एका व्यक्तीला घर-परिवाराचा त्याग करून वीस वर्ष झाली होती. त्याला जेव्हा समाचार ऐकविला की तुझ्या पत्नीचा देहांत झाला आहे. त्याने सुखाचा श्वास घेत म्हटले की, ''बरे झाले, पाठ सुटली!'' स्पष्ट आहे की, शरीरापासून दूर जाऊनही मनातील राग मिटला नव्हता. मनामध्ये राग असेल तर, वैराग्य हे दिखाव्यापुरते असते. **कित्येक वेळा आजार बाहेरून शरीरावर दिसत नाही. परंतु आतून घातक रूपाने पसरलेला असतो. मनातील राग ही आध्यात्मिक स्वास्थ्यासाठी आतल्या आत पसरलेला घातक आजार आहे.**

कित्येक वेळा व्यक्तीला अति-प्रिय, प्राण प्रिय व्यक्तीपासून धोका मिळाल्यामुळे असे वाटते की, जगात काहीही विश्वासपात्र नाही. राजा भर्तृहरीला प्राणप्रिय पत्नीने दगा दिला, त्याचे मन कष्टी झाले. राजाला वैराग्य आले. जंगलातून जाता-जाता त्याला एक चमकता मणी दिसला. मन आकर्षित झाले! परंतु अरे, हे काय, उचलायला लागला तर पानाच्या पिचकारीने त्यांचे हात खराब झाले. भर्तृहरी आपल्या मस्तकावर हात ठेवत, आपल्याशी बोलला - अरे भर्तृहरी! तू तर भरलेल्या खजिन्याला ठोकर मारलीस. परंतु मणीची आसक्ती अजूनही गेली नाही! अजून किती धोके खायचे आहेत? भर्तृहरीला पत्नीमुळे वैराग्य आले होते, धनाचे वैराग्य नव्हते. धनाच्या आसक्तीचे बीज तर नष्ट झाले नव्हते. म्हणून तो आकर्षित झाला होता.

## ज्ञानबळाने मनाला मुरड घाला

**आम्हालाही स्वत:ला विचारायचं आहे की आमची वृत्ती कोणकोणत्या गोर्ष्टींपासून पूर्ण उपराम आहे? कोणत्या गोर्ष्टींपासून अर्ध उपराम आहे आणि**

**कोणामध्ये पूर्ण वृत्ती बुडालेली आहे? प्रत्येक तपस्वीला अशी सूची तयार करून आत्मअवलोकन करायचे आहे. स्वत:च्या मनाला ज्ञान बळाने मुरड घालायची आहे.** ज्याप्रमाणे एक शिंपी कपड्याचा अनावश्यक भाग कापून टाकतो. तो भाग कापल्याने काही नुकसान होत नाही. अजूनच कपडा सुंदर आणि उपयोगी होतो. परंतु ज्ञानाशिवाय जर कोणी कपडा कापू लागला, तर कपडाच खराब होईल. **अशाप्रकारे, राग वा आसक्ती उत्पन्न करणाऱ्या गोष्टी ईश्वरीय ज्ञानानुसार सोडल्या तर जीवन सुंदर आणि सदुपयोगी बनते.** परंतु ज्ञानाशिवाय, जिद्द, ईर्ष्या, धोका मिळाल्यामुळे परिस्थितीवश जर आपण किनारा करू. त्याचा त्याग करू. तिरस्कार करू, तर त्यात स्वत:च्या आणि इतरांच्या जीवनाचे नुकसानच आहे.

## वैराग्याची मनोभूमी

यादगार शास्त्र रामायणात दाखविले आहे की, भगवंताची साथ प्राप्त करण्यासाठी इच्छुक सीता रूपी आत्म्याने पित्याचा राजमहाल, सासऱ्याचा राजमहाल सर्व काही ठोकरले आणि ती वनात गेली. कित्येक वर्ष त्याग आणि वैराग्याचे जीवन व्यतीत केल्यानंतर, एक सोन्याच्या हरणाची लालसा उत्पन्न झाली आणि जिवंत अथवा मृत-कोणत्याही रूपात ते प्राप्त करण्याचा हट्ट केला. तिच्या मनात कुठे ना कुठे सोन्याप्रति असलेला अनुराग दडला होता जो सोन्याचे हिरण पाहून अंकुरीत झाला. रामाने विचार केला की सीतेला माझ्यापेक्षाही जास्त प्रेम आता सोन्यावर झालं आहे, तर तिला सोन्याच्या नगरीतच पाठवून दिले. जिथे तिला दु:ख, त्रास, विरह आणि अश्रूंशिवाय काहीच मिळाले नाही. त्याग-तपस्येच्या मार्गात अशा प्रकारचे सोनेरी हिरण शेवटपर्यंत आकर्षित करीत राहणार! एकांतात बसून आकर्षण करणाऱ्या त्या संभाव्य गोष्टींना मनाच्या नेत्रासमोर आणून, स्वत:च स्वत:ला विचारा की, जर मला हे मिळालं तर मी त्याचे काय करेन? ते मिळाले तर मी काय करेन? वस्तू मिळण्यापूर्वीच आपली वैराग्याची मनोभूमी बनविली तर त्यात फसण्याची शक्यता कमी होईल. नाहीतर एका छोट्याशा छिद्रातूनही माया प्रवेश करेल.

**शिवबाबा म्हणतात की, पुरूषार्थात जर कोणी समस्या रूप बनत असेल तर त्याचे कारण सदाकाळच्या वैराग्य वृत्तीची कमी. आता बेहदचे वैराग्य हवे!** बेहदचे वैराग्यच सदा काळचे असते. एका बाजूला उमंग-उत्साह, खुशी असावी तर दुसऱ्या बाजूला बेहदचे वैराग्य. हे वैराग्य सदा सर्वदा न राहण्याचे कारण आहे - देहअभिमान. सेवेद्वारे साधने वाढत आहेत. प्रकृती दासी बनत आहे. परंतु लक्षात ठेवा की बेहदच्या वैराग्य वृत्तीनेच साधना आणि साधनांचे संतुलन राखता येते.

## बेहदचे वैराग्यच खरे वैराग्य

वरील सर्व उदाहरणे हदच्या वैराग्याची होती. आता आपण बेहदचे वैराग्य काय आहे, ते जाणून घेऊ. शरीर विनाशी आहे. हे जाणून मी आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे. शरीराचे पदार्थ, प्राप्ती, वैभव, संबंध आणि जुने संस्कार यापासून स्वत:ला अलिप्त करणंच बेहदची वृत्ती आहे. यासाठी घराचा, संसाराचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. परंतु या ज्ञानाची आवश्यकता आहे की, सृष्टी एक कर्मक्षेत्र आहे. माझे स्वत:चे घर परमधाम आहे. ज्याप्रकारे नाटकातील नट काम संपल्यावर घरी परत जातो. असेच मला ही परमधामात घरी परतायचे आहे. जेथून आलो आहे. तेथे परत जाण्यासाठी आपल्या मनाला सहज तयार करणे; हेच खरे वैराग्य आहे. यात काही जोर-जबरदस्ती किंवा दमन करण्याची आवश्यकता नाही. हे तर स्वाभाविक आहे. आनंदाची गोष्ट आहे. हे तर एक मधुर वैराग्य आहे. तेव्हा आपण ही गोष्ट स्वीकारतो की या दुनियेतील मुसाफरी (यात्रा) पूर्ण करून आता ईश्वराच्या प्रेमळ आठवणीत लवलीन व्हायचे आहे, ही तर आनंदाची गोष्ट आहे. आपण जे सोडत आहोत. त्याचे दु:ख नाही, तर जे प्राप्त करीत आहोत. त्याचा आनंद आहे. सोन्याची अंगठी देऊन, जर कोणी लोखंडाची अंगठी परत घेत असेल, तर आपण आनंदाने ते करू. **त्याप्रमाणे चारी बाजूंनी समस्यांनी घेरलेल्या सृष्टीच्या बदल्यात सत्ययुगी स्वर्णिम दुनियेत जाण्याची खुशखबर ऐकून, प्रत्येकाचे मन आनंदित होते. हेच बेहदचे वैराग्य आहे. अशा वैराग्यात, भोगापेक्षा अनेक पटींनी, जास्त आनंद आहे. असे खरे वैरागी, आत्मा आणि शरीराने भरपूर दिसत असतात.** त्यांच्या चेहऱ्यावर लालीमा, डोळ्यांमध्ये आत्मियतेची चमक, आणि कर्मांमध्ये सुखाचा झरा वाहत असतो. कोणी योग्यच म्हटले आहे-

**जो फकीरी मिजाज होते है,**
**ठोकर में ताज रखते हैं।**
**कल की चिन्ता क्यों, मुट्ठी में आज रखते हैं।**

## संसारात राहा परंतु फसू नका

बेहदच्या वैरागी ▶ पान १० वर

# जीवनाचे खरे सार - प्रेम

भाग - १

-ब्र. कु. हेमंत भाई, शांतिवन, आबू रोड

जगात कुणाला नकोयं.. प्रेम? देव, दानव व मानवच नव्हेत तर वनात वावरणारे प्राणी व आकाशी झेप घेणारे पक्षी ही प्रेमासाठीच आतुर असतात. प्रेम प्राप्त करणे हीच मानव मनाची सदासर्वदा एकमेव इच्छा असते. प्रेम मानवाची सहज, सुलभ सवय व आत्म्याची स्वाभाविक वृत्ती होय. मानवी हृदयात रूजलेले, जोपासलेले प्रेम, ही मंगल कामना आहे. प्रेम हाच मानवाचा मूळ, शुद्ध व श्रेष्ठ संस्कार आहे. मनुष्य असो वा पशु, पक्षी, प्राणी सर्वांनाच प्रेमाची उधळण करणे आणि प्रेमाच्या अनमोल मोर्तीनी झोळी भरणे नेहमीच आवडते. प्रेम मिळाले नाही तर जगणे अत्यंत कठीण होते. **कारण प्रेम आयुष्याचे मोल व जीवनाचा रस आहे. परंतु किती आश्चर्य? आजच्या मानवास खऱ्या प्रेमाची व्याख्या सुद्धा माहित नाही. व्यक्ती स्वार्थपूर्ति व वासनेलाच खरे प्रेम समजू लागलायं.**

परंतु हे मात्र खरं नाही. खरे तर प्रेम ही हृदयातून पाझरलेली शुद्ध भावना होय. जेव्हा व्यक्तीचे लक्ष एखाद्याच्या गुणांवर जाते तेव्हा गुणवानाकडे मन सहजच मोहित होते व हृदयात आपलेपणाच्या भाव व भावना जागृत होतात. मग ते गुण व्यक्ती-प्रकृती, पशु-पक्षी-प्राणी यांच्यातील असोत की स्थूल जड वस्तू-वैभवात. गुण हे गुणवानांकरिता आपला असल्याची जाणीव जागवतात. अंत:करणात प्रकट



झालेली ही आपलेपणाची भाव-भावनाच प्रेम होय. **प्रेम आत्म्याची आदि अनादि मुळ प्रवृत्ती व खरी संपत्ती ही आहे. हे आत्म्याचे अविनाशी गुणधन व जीवनामृत होय. खरे तर आयुष्याचे उद्यान स्नेह सुमनांनीच सुगंधित होते. प्रेमाच्या कळ्या उमलून प्रसन्नतेच्या पुष्पांनी जीवनाची बाग बहरून जाते.**

ज्याप्रमाणे निष्पाप निरागस बाळाचं भोळेपण सर्वांना आकृष्ट करतं. त्याची बालसुलभ क्रिडा मनाला अति प्रसन्न करते व आपोआप त्याच्याशी हृदयाचं नातं जोडते. ज्यामुळे हृदय सागरात स्नेहाच्या लहरी उठतात. त्यातच ते बाळ स्वत:चं अपत्य असेल तर त्याच्यासाठी त्याग करणे व सहन करणे सोपे असते. त्याच्यासाठी सर्वस्व पणाला लावणे कठीण नसते. जो आपला असतो त्याचे अवगुण ही सहजच विसरले जातात. प्रेमी व्यक्तीच्या उन्नतीसाठी नेहमीच जागृत राहणे ही साहजिकच वाटते. त्यास न मागता मदत ही दिली जाते. त्याच्या चुका व वाईट खोड्यांना सहज पोटात घातले जातात. विशेष म्हणजे प्रेमापोटीच अपराध्याच्या अपराधास क्षमा करणे संभव होते.

फूलांचा रंग व सुगंध सर्वांना त्यावर मोहित करून, मनी स्नेह निर्माण करतो. मुके पशु, पक्षी ही प्रेमाची भाषा जाणतात. हिंसक वन्य प्राणी ही प्रेमाच्या जादूने हिंसा सोडून, मनुष्याच्या अवती भोवती गिरक्या घेतात. दगडाला ही पाझर फोडणारी ही अशी स्नेहाचीच अद्भूत शक्ती होय. ह्या चमत्कारी शक्तीने शत्रूही मित्र बनतात. खऱ्या अर्थाने प्रेमच मानवास सशक्त बनविते. प्रेम अंतर्मनात भाव, भावना, व संवेदना जागवते व पुरूषाचे (आत्म्याचे) प्रकृतीशी (निसर्गाशी) नातं जोडते. फक्त प्रेमच सोन्यासारखा निखार देऊन विश्वाला स्वर्गाचे रूप देते.

प्रेमाचा भुकेला कोण नाही? हीन-दीन-दुबळे, रंजले-गांजले, गरीब-श्रीमंत, कुरूप-सुंदर, संत-सज्जन ह्या सर्वांचा संपूर्ण संसार स्नेहातच सजतो. प्रत्येक प्राण्याचा प्राण व प्रगतीचा

आधार फक्त प्रेमातच वसतो. जसे प्राणवायु शिवाय हृदय धडकू शकत नाही तसेच प्रेमविहिन जीवनाची कल्पना कुणी ही करू शकत नाही, **कारण प्रेम सुखमय जीवनाचा श्वास, मन मंदिरात पसरलेला पावन प्रकाश व आत्मारूपी पक्षाला ऊंच भरारी देणारे आकाश होय. खरं तर प्रेम आहे हृदय मंदिरातील देवतेस अर्पण केलेल्या भावपुष्पातला सुवास! तसेच प्रेमापोटीच संभव होतो मानवाचा खरा विकास!**

परमात्म प्रेम, ईश्वर प्रेमीस प्राप्त परम पुरस्कार आहे, तर सात्विक स्नेह संताचा सर्वश्रेष्ठ अलंकार. प्रेम आदर्श व्यक्तिमत्त्वाचा श्रृंगार आणि उदार हृदयाने दिलेला उत्तमोत्तम उपहार आहे. प्रेम हे सुखमय संसाराचे सार, वैश्विक प्रेम विराट विश्वाचा विस्तार व विश्वबंधुत्वतेच्या बृहद भावनेचा आधार आहे. दैवीप्रेम देवी देवतांची दिव्य दौलत आहे तर आत्मिक प्रेम सर्वे-श्वराची 'सल्तनत' (अर्थात परमेश्वराचे साम्राज्य) अल्ला तालाची इबादत, खुदाची खुदाई खिदमत (ईश्वरीय सेवा) आहे. अंत:करणातले अविनाशी प्रेम अमरता देणारे अमृत आहे.

प्रभुप्रीत ही प्रभु प्रियतमच्या मिलनासाठी त्यास केलेली प्रेमळ प्रार्थना आहे. **खरे प्रेम, सत्यम्-शिवम्-सुंदरम् स्नेहसागरास प्राप्त करण्याची सर्वोत्तम साधना आहे. प्रेम ही आराध्याची मन:पूर्वक केलेली, आपलेपणाने भरपूर असलेली, अर्पणमय आराधना व चरित्रवानाच्या चारित्र्याची चेतना आहे.** स्नेह, सहनशील व क्षमाशील व्यक्तीची संवेदना, साथ-सोबतीसाठी व्याकुळ असलेल्या आशिक माशुकाची विरह वेदना आहे. प्रेम ही स्नेही सेवाभावी साठी मनात बाळगलेली शुभभावना-शुभकामना आहे. प्रेम मुळातच प्रत्येक मानवी मनाची मनोकामना आहे. प्रेम विकृत विकारी विषय वासना नाही तर अंत:करणातली उत्कृष्ट उपासना आहे.

परमात्म-प्रेम ही भगवत भक्ती, सर्वशक्तिवानानं दिलेली सुरक्षा शक्ती आणि मानव मात्रास झालेली अनमोल प्राप्ती आहे. ही अंत:करणाची अमिट अनुभूति व दीन-दु:खी जनांसाठी हृदयात निपजलेली सहानुभूति ही आहे. परमात्म प्रेम, परमपुरूष परमात्म्याशी प्रत्येक प्राण्याची प्रीती, मूल्यांच्या माळेतला मूल्यवान मोती, प्रेमींच्या अंतर्मनात तेवत असलेली अखंड दीपज्योती आहे. प्रेम प्रत्येक आत्म्याची प्रकृती (स्वभाव) आणि कर्तव्यपरायण व्यक्तीला किर्ती देणारी कृती होय. या प्रेमातच सजते आदि सनातन देवी देवता धर्माची दैवी संस्कृती.

प्रेम हे प्रिय व्यक्तीला हृदयात लिहिलेले पत्र व चिंतनाच्या पडद्यावर प्रकट झालेले चित्ताकर्षक चित्र आहे. सत्कर्मात सद्गुणांच्या सुंगधाने दुर्गुणांचा दुर्गंध मिटवणारे, स्नेह सुगंधित अत्तर आहे. **खरं प्रेम मित्रतेचा महामंत्र, मूल्यनिष्ठ समाजाच्या निर्मितीचा मूलमंत्र आणि विश्व व्यवस्थेचे उत्तम तंत्र, स्वर्णिम संस्कृतीचे सृजनशील यंत्र आहे. प्रेमच मानवतेचे एकमात्र संरक्षक छत्र आणि विश्वबंधुत्वतेच्या भावनेने, विश्वास 'वसुधैव कुटुम्बकम्' मध्ये साकार करणारे मंगल सूत्र आहे. प्रेम दिव्य गुणांचा परममित्र ही आहे. खरोखर प्रेमाचे साम्राज्य, संसार वा सृष्टीत यत्र तत्र सर्वत्र आहे.**

प्रेम मनाचे मनाशी महामिलन व आपल्याशी आपुलकीचे आलिंगन आहे. विनम्र-प्रेम, वंदनीय वरिष्ठ जनाचे वंदन आहे तर मातापिता व पालकांनी केलेली प्रेमयुक्त प्रशंसा अपत्याचे अभिनंदन होय. देशप्रेम वीरतेचे वरण, हीनतेचे हरण, पराधीनतेचे पतन व शौर्य साहसाचे संवर्धन होय. स्नेह-सन्मान आदरणीय वरिष्ठ जनांचे अभिवादन आहे. स्नेहसिंधूचे, स्नेहामृताचे पान आत्मिक रसास्वादन आहे.

मातेचे वात्सल्ययुक्त प्रेम बाळासाठी सद्गुण संवर्धक गुटी आणि मुर्च्छित मनासाठी स्नेह संजीवनी बूटी होय. या उलट प्रेमाचा अभाव तर जीवनातली परम त्रूटी (कमी) होय. नि:स्वार्थ प्रेम जननी, जन्मदात्री मातेचे जीवनदायिनी कर्म, धरती मातेचा धैर्य-धर्म आणि जगत् जननी परमात्म्याच्या असीम ममतेचे मर्म आहे. सहृदय स्नेह सत्पुरूषांचे खरे सौंदर्य, चरित्रवान-शीलवानाची शोभा व अलौकिक प्रेम अध्यात्मप्रेमीची आभा आहे तर पवित्र प्रेम प्रेरक पुरूषांची प्रभा होय. जिकडे पहावे तिकडे प्रत्येक जण जणु प्रेमाचाच दिवाना आहे, कारण देवाने दिलेला हाच एक अनमोल खजिना आहे.

**प्रेम हा रोग (प्रेमरोग) नव्हे, परंतु आत्म्याचा परमात्म्याशी मन-बुद्धीचा योग होय. स्नेह म्हणजे दैहिक भोग (कामचेष्टा) वा विकार-व्याधी नाही, प्रेमाने केलेली ईश्वराची आठवण तर सहज योग, समाधी वा आरोग्यदायी औषधी होय. परमात्म्याशी प्रेमपूर्वक केलेल्या (प्रेम) योगानेच कर्मभोग कटतात व मनोरोग मिटतात.** प्रेम तना-मनाच्या दु:खाची दवा व दु:खीजनांकरिता मागितलेली दुआ आहे. स्नेह समस्त संसाराची सुखदायी सेवा, सेवाधाऱ्याला मिळालेला मधुर सुका-मेवा आणि शोक

संतापाने संतप्त झालेल्यांसाठी, प्रेम थंड हवा ही आहे. खरोखर सृष्टीरंगमंचावर सर्वत्र प्रेमाचीच अभिव्यक्ती आहे.

स्नेह हे विजयी बनविणारे शस्त्र होय आणि खऱ्या अर्थाने जीवन जगायला शिकविणारे शास्त्र ही. एखाद्या क्रूर वा क्रोधीला जिंकण्याचे हे एकमेव ब्रह्मास्त्र आहे. प्रेमाने हृदयपरिवर्तनाचा असाच एक प्रेरक प्रसंग आहे. एका स्त्रीचा पती अति क्रोधी स्वभावी होता. नेहमीच तो मारहाणीवर उतरत असे. ज्यामुळे ती महिला त्याला घाबरलेली असे. एके दिवशी गावात एक बुद्धिमान महात्मा पोहोचले, ते क्षणभरात समस्येचे समाधान करीत. स्त्री त्या महात्म्यापाशी पोहोचली व म्हणाली, 'महात्माजी माझे पती अति क्रोधी आहेत, माझ्याशी प्रेमाचे दोन शब्द ही बोलत नाहीत. कृपाकरून आपण मला असा मंत्र द्या की जेणेकरून माझा पती माझ्या वश होईल' तेव्हा ते महात्मा म्हणाले, मी मंत्र अवश्य दिला असता परंतु मंत्र भारण्यासाठी वाघाचा केस लागेल.

दुसऱ्या दिवशीच स्त्री वनात पोहोचली. तेथे तिने वाघ बघितला. तिला पाहून वाघ गरजला. स्त्रीने घाबरून पळ काढला. त्यानंतर ती वाघासाठी मांस घेऊन आली व ते मांस ठेऊन दुरूनच गंमत पाहू लागली. वाघाने आयते मिळालेले मांस भक्षण केले. रोज हाच क्रम चालू राहिला. दिवस, आठवडा व नंतर महिना पूर्ण झाला. आता स्त्री व वाघ एकमेकाला ओळखू लागले. स्त्री ही निर्भय झाली व बेधडक वाघाच्या जवळ जाऊ लागली. हळू हळू ती त्याला कुरूवाळू ही लागली. अखेर स्त्रीने वाघास प्रेमाने वश केले.

एक दिवस हिंमत करून तिने वाघाचा केस तोडला व धावत जाऊन साधुच्या हाती दिला व म्हणाली, 'हा घ्या वाघाचा केस आणि द्या बरं मंत्र.' तेव्हा तिच्या हातून केस घेत, साधुने तो आगीत टाकला. तेव्हा ते पाहून स्त्री म्हणाली, 'महात्माजी हे काय केलं तुम्ही?' तेव्हा महात्मा उत्तरले, 'जर तू हिंसक वाघाला प्रेमाने जिंकू शकते, तेव्हा तूझा पती तर एक मानवच आहे ना? मुली आता तुला वाघाच्या केसाची गरज नाही, फक्त मनात पतीविषयी प्रेमभाव जागृत कर,' ती स्त्री हसत-हसत घरी परतली कारण तिला पतीला वश करण्याचा महामंत्र मिळाला होता.

**प्रेमाची शक्ती अद्‌भूत आहे. गिरधर गोपालाच्या प्रेमाखातर मीरा विषाचा प्याला ही प्याली. जगाला प्रेमाचा संदेश देत येशु क्रुस वर चढले. श्रीकृष्ण, श्रीरामासारखे देवात्मे, गौतमबुद्ध, येशू, मोहम्मद सारखे धर्मात्मे, बापू गांधी सारखे महात्मे सर्वांनीच जगाला प्रेमाचा धडा दिला. खरे प्रेम क्षमा, सहनशीलता, सेवा, परोपकार, दया-करुणा इत्यादी महान गुणांना जन्म देते.** मूळ रूपात आत्मा प्रेमस्वरूप व परमात्मा प्रेमाचा सागर आहे. ह्याचा अनुभव स्व-स्वरूपात स्थित होऊन, परमात्म्याशी हृदयाचे नाते जोडल्यानेच होऊ शकतो. म्हणूनच मानव मात्र, प्रकृती, पशु, पक्षी सर्वांवर विनाअट नि:स्वार्थ प्रेमाची उधळण करा व आशिर्वादाच्या अनमोल मोतींनी आपली झोळी भरा हीच आमुची मंगलकामना.....

या अनुषंगाने एका कवीने अतिशय सुंदर शब्दात म्हटले आहे-

**''खरा तो एकची धर्म,**
**जगाला प्रेम अर्पावे।''**

**(क्रमश: पुढील अंकात....)**

■

---

पान ७ वरून व्यक्तीचा आपला कोणी नाही. परंतु पूर्ण संसार आपला. एक म्हण आहे - रागी व्यक्ती आपले घर जाणतो. परंतु वैरागी तर घराघराला जाणतो. त्याची वृत्ती एकरस, हलकी आणि निर्विघ्न असते. पाच विकारांवर नृत्य करीत तो प्रकृतीवर विजय प्राप्त करतो. त्याच्यात प्रत्येक परिस्थितीत सामावण्याची शक्ती असते. तो मिलनसार असतो. त्यामुळे सदैव हसतमुख राहतो. नेहमी ईश्वराच्या हृदय सिंहासनावर विराजमान होऊन, सृष्टी नाटकाचा साक्षी, द्रष्टा आणि सर्वांचा प्रिय बनतो.

**आपण सुद्धा या दुनियेतील वस्तूंना पाहून, स्पर्श करून त्यांचा उपभोग घेतो - परंतु त्यांना ईश्वराची अमानत ठेव समजून, ट्रस्टी बनून, सेवा व परोपकाराच्या भावनेने. वस्तूंना आपल्या मनाचा ताबा घेऊ न देता, ईश्वराच्या श्रीमताप्रमाणे, मालक बनून त्यांना सेवेत लावतो आणि पुन्हा आपल्या साधनेमध्ये तल्लीन होतो. वस्तू मुल्यवान आहेत. परंतु आपली साधना, त्यापेक्षाही अधिक अमूल्य आहे. तुच्छ, नश्वर वस्तूंसाठी आपण आपली साधना खराब करू शकत नाही. कारण साधना आत्म्याच्याबरोबर जाणार आहे. वस्तू तर इथेच राहतील!**

**(संदर्भ : अमृत संग्रह: भाग २)**
**(भावानुवाद: ब्र. कु. मीनाक्षी, ठाणे पूर्व)**

■

# प्रकाशाकडून सकाशाकडे ..



- ब्र. कु. अनुराधा खोत, पुणे

प्रकाश... आपल्या मानवी जीवनात, पृथ्वीवरच्या प्राणिमात्रासाठी, सृष्टीसाठी अत्यंत आवश्यक अशी गोष्ट म्हणजे प्रकाश. प्रकाश किती महत्त्वाचा हे सांगायचं तर शब्द कमी पडतील अशी या प्रकाशाची महत्ता!

आपली भारतीय संस्कृती ही प्रकाशपूजक आहे. त्यामुळे प्रकाश, ऊब, उष्णता, पाऊस हे सर्व देणाऱ्या सूर्याला आपण देव मानलं. अर्थात् कृतज्ञता हीच भावना त्याच्या मुळाशी होती. परंतु केवळ भौतिक जीवनात आपण त्याचं (प्रकाशाचं) महत्त्व मानलं असं नव्हे तर त्याचं आध्यात्मिक महत्त्वही आपण जाणलं. कुठल्याही दिव्य गोष्टीचा साक्षात्कार होताना आधी दिसतो तो प्रकाश. नंतर मनात रेंगाळत राहतो. तोही प्रकाश, अन् रोज नियमितपणे येऊन आपल्याला जागवतो तो प्रकाशच.

युरोपात शास्त्रीय संशोधनाची पहाट उगवल्यानंतर जीवनाच्या सर्वच क्षेत्रात 'क्रांती' म्हणण्यासारखे बदल झाले. संशोधन, परिक्षण, प्रयोग, निष्कर्ष यांना महत्त्व आलं. (अरविंदांच्या एका दीर्घ कवितेत याचं फार सुरेख वर्णन आलं आहे.)

१८१५ मध्ये फ्रेस्नेल यांनी सांगितलं की प्रकाश हा तरंगांनी बनलेला असतो. १८६५ मध्ये मॅक्सवेल् या शास्त्रज्ञानं म्हटलं की तो विद्युत चुंबकीय लहरींनी बनलेला असतो. आईनस्टाईन या महाबुद्धीवंतानं १९०५ मध्ये सांगितलं की प्रकाश हा ऊर्जाकणांनी बनलेला असतो. पुढे १९१५ मध्ये त्यांनीच सांगितलं की प्रकाशावर गुरुत्वाकर्षणाचा परिणाम होतो.

संशोधन पुढे जात राहिलं १९६० मध्ये लेझर किरणांचा क्रांतिकारी शोध लागला. १९६५ पासून प्रकाशाचा दूरसंचारासाठी उपयोग होऊ लागला. विसाव्या शतकात प्रकाशानं वेगवेगळ्या प्रकारे अनेक क्षेत्र व्यापून टाकली. वैद्यकीय क्षेत्र, माहिती नि तंत्रज्ञान, ऊर्जा, कला, संस्कृती, पुरातत्त्व, खगोलशास्त्र.... आणि कितीतरी! एकविसावं शतक हे तर प्रकाशविज्ञानाचं म्हणजे फोटोनिक्स्‌चं शतक ठरलं. २०१५ हे वर्ष युनेस्कोनं 'प्रकाशवर्ष' म्हणून घोषित केलं.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मुळाशी 'फोटोनिक्स्' हेच आहे आणि भविष्यातील प्रदूषण-विरहित ऊर्जा निर्मितीसाठी अक्षय, शाश्वत अशी सौरऊर्जाच कामी येणार आहे.

'Autobiography of a Yogi' या सुप्रसिद्ध ग्रंथांचे लेखक परमहंस योगानंद म्हणतात.

'विश्वातल्या असंख्य रहस्यांपैकी सर्वाधिक मोठं रहस्य आहे प्रकाश! ध्वनिलहरींना माध्यम लागतं. प्रकाश, अंतराळातल्या निर्वात पोकळीतून मुक्तपणे हिंडत असतो. निसर्गात स्वत: प्रकटणाऱ्या सर्व गोष्टीत सर्वात सूक्ष्मतम आणि सर्वस्वी मुक्त असं काही असेल तर ते आहे 'प्रकाश' तत्त्व!'

विज्ञान आणि तत्त्वज्ञान, नव्हे अध्यात्म ही एकेकाळी फार दूर वाटणारी क्षेत्रं, वेगानं जवळ आली आहेत.

आता एक वर्ष झालं. मी 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालया'त जे ज्ञान घेत आहे त्यातून 'सकाश' हा शब्द माझ्या ओळखीचा झाला. काय आहे हा सकाश?

ऐका, फार फार रोचक प्रकरण आहे हे! आणि इतकं सुंदर की मला वाटतं माझ्याप्रमाणे ते साऱ्यांच्याच ओळखीचं व्हावं. हा सकाश सर्वांना माहिती व्हावा, मिळतं राहावा, घेता यावा नि देताही यावा!

**तर सकाश म्हणजे काय?**

व्याख्याच खूप सुंदर आहे. **सकाश म्हणजे आध्यात्मिक प्रकाश. आपण**

**आहोत सूक्ष्म प्रकाशबिंदू -आत्मा. तर परमात्माही सूक्ष्म प्रकाशबिंदूचं असला तरी तो आहे मुख्य सात गुणांचा सागर. सर्वच सद्गुणांचा सागर. त्यामुळे त्याच्यामधून सातत्यानं जो प्रकाशझोत बाहेर पडत राहतो तो सकाश!** प्रकाश असूनही, फार मोठा फरक असा की, हा सकाश असतो शीतल. सूर्याचा प्रकाश उष्ण, प्रसंगी भाजून काढणारा, जीवघेणा. सकाश हा शीतल, संजीवक.

**प्रकाश आपल्या ग्रहमालेला सूर्याकडून मिळतो. तर सकाश येतो. परमधामातून. ब्रह्मांडातून, जिथे परमात्म्याचा निवास असतो. थेट त्याच्याकडून येतो म्हणून तो आहे ऊर्जा + प्रकाश. शुभऊर्जा + प्रकाश. 'इट ईज् इंटेलिजंट लाइट् विच रिज्युव्हेनेट्स्!' असा हा सकाश परमात्म्याच्या संपूर्णत: सकारात्मक सद्गुणसंपत्तीनं समृद्ध असल्याने शक्ती, सामर्थ्य, बल देणारा असतो. त्याच्यामध्ये परमात्म्याच्या प्रमुख सात गुणांचे (शक्ती, पवित्रता, सुख, प्रेम, शांती, ज्ञान आणि आनंद) यांचे सात रंगांचे किरण सामावलेले असतात. पूर्णत: सकारात्मक आणि आत्मिक प्रकाशानं भरलेली अशी ही शक्ती आहे-प्रकाशरूपच.**

या ज्ञानात येऊन, समजून या ज्ञानाचा स्वीकार केल्यानंतरच, हा सकाश आपल्याला घेता अन् देता येतो. सूर्यप्रकाश हा आपण सूर्यस्नान इत्यादी द्वारे घेऊ शकतो. परंतु तो आपण देऊ शकत नाही. आत्मा हा परमात्म्याचा संतान. म्हणून त्याच्यामध्ये परमात्म्याचे ते सातही गुण असतात. आत्म्यातले हे गुण जाणून घेऊन, प्रयत्नपूर्वक जागवावे अन् जोपासावे लागतात. परमात्म्याकडून सकाश सतत येत असतो. तर आत्म्याला म्हणजे आपल्याला, तो घेणं नि देणं हे प्रयत्नपूर्वक शिकून, तपस्या करून साध्य करता येतं. संकटात सापडलेल्या, आजारी वा दु:खी आत्म्यांसाठी हा प्रयोग यशस्वीपणे केला जाऊ शकतो हीच 'मन्सा' केली जाणारी सेवा होय.

सूर्यप्रकाशात ७ रंग आहेत. सकाशात कदाचित सूर्यप्रकाशात नसणाऱ्या अनेकानेक रंगछटा असतील. प्रकाशाचा विशिष्ट वेग आहे. सकाशाला वेगमर्यादा नाही. प्रकाश आपल्याला भौतिक जाणीव देतो तर सकाश हा बुद्धिगम्य आहे. सूर्यप्रकाशामुळे दृष्टीला वस्तू दिसतात. सकाशामुळे आत्मिक स्तरावरचे, न दिसणारे, परंतु जाणवू शकणारे हेतू साध्य करता येतात. सूर्यामुळे ग्रहमाला उजळते. सकाशामुळे विश्व उजळते. आत्मिक स्तरावरचं विश्व प्रकाशित होतं.

## सकाश घ्यावा, सकाश द्यावा –

**परमात्म्याकडून सकाश घेऊन सबळ होण्याची सर्वोत्तम वेळ ही अमृतवेळा (पहाटे ४ ते ४.४५) असं साऱ्या दादी सांगतात. पण ती वेळ तुम्हाला नाहीच जमली तर इतर वेळीही आपण तो घेऊ शकतो. फक्त पहाटे, वातावरण शुद्ध स्वच्छ असतं. अजून सर्व लोकांच्या नकारात्मक विचारलहरी किंवा तणावाचे विचार अजून वातावरणात उमटलेले नसतात, म्हणून ती वेळ सर्वोत्कृष्ट.**

हा सकाश आधी आपण स्वत:साठी घ्यायचा. एखादा स्वमान घेऊन त्याच विचारात राहायचं. त्याची शक्ती परमात्मा आपल्याला देत आहे. सकाशाद्वारे अशी उत्कट कल्पना करून ती आपल्या आत्म्याच्या ठिकाणी घ्यायची. घेत राहायची. तिनं स्वत:ला नखशिखांत भरून टाकायचं. स्वत:ला पूर्ण भरून घेतल्यानंतर, मग तो आपण आपल्या घरादाराला द्यावा. आपला देह त्या शुभ्र सकाशानं भरून जाऊन, आतून पूर्णपणे निर्दोष, निरोगी आणि बलवान होत आहे. आपल्या कुटुंबातील सर्व आत्मेही त्याचप्रकारे निर्दोष, निरोगी आणि बलवान झाल्याचं मन:चक्षूंनी पाहावं. आपलं संपूर्ण घर त्या सकाशानं उजळून गेलं आहे असं पाहावं. दुखणी गाशा गुंडाळून पळून गेली आहेत. असं पाहावं ही भावना उत्कटतेनं अनुभवून आनंद घ्यावा. आता याच पद्धतीनं आपण आपली राहती इमारत, आपला परिसर, आपला गाव, शहर, प्रांत, देश आणि पृथ्वी, सर्वांनाच सकाश पायरी-पायरीनं देऊ शकतो.

हा सकाश आपण देहरूपात बसल्या-बसल्या, बिंदूरूपात जाऊन, आकारी स्वरूपात वा देवदूताच्या 'फरिश्ता' रूपात, कुठल्याही प्रकारे देऊ शकतो. हा सकाश आपण शांततेत बसून, स्वत: आधी पूर्ण शांत होऊन (मन-बुद्धीतील विचारांची गर्दी यांना थांबवून) द्यायचा आहे. एकदा सवय झाली की, प्रवासात असलो, गर्दीत व समूहात बसलो असलो तरी, गोंगाटात असलो तरीही मन शांत करून हवा त्याला, योग्य तसा देऊ शकतो. **सकाश देतो तो आत्माच; आणि घेणारा दुसरा आत्मा, अनेक आत्मे, प्राणिसृष्टी, वनस्पतीसृष्टी, शेतातली पिकं-फळं-फुलं-निसर्ग, असू शकतो. आपण आपल्या पृथ्वीला, तसंच ग्रहमालेलाही सकाश देऊ शकतो.**

सकाशाचा आपल्याजवळचा साठा पुरेसा नाही असं वाटल्यास, आपण एकीकडे परमात्म्याकडून सकाश घेत रहायचं, दुसरीकडे तो गरजू व्यक्तीला (आजारी व्यक्ती, मानसिक क्लेशात असणारी वा संकटात असलेल्या) देत राहायचं किंवा निसर्गनिर्मित संकटात

(उदा. भूकंप, भूस्खलन, महापूर) किंवा मनुष्यनिर्मित संकटात उदा. बॉम्बस्फोट (बॉम्ब फुटणे इ.) सापडलेल्यांना. सर्वांना मदत मिळावी अशी उत्कट इच्छा करून, तसं मनश्चक्षूंनी पाहात, निरपेक्ष, निर्मळ मनानं सकाश पोहोचवता येतो.

**सकाश देण्याची पद्धत–**

**आपण घरात बसून सकाश देतो. त्याची पद्धत अशी की आपलं मन प्रथम शांत, निर्मळ करायचं. त्यासाठी राग, लोभ, द्वेष, तिरस्कार सर्व काही दूर ठेवायचे, संपवायचेच असतात ते. द्वापरयुगापासून (गेल्या त्रेसष्ट जन्मात) आपण ज्यांचं नुकसान केलं, मनस्ताप, दु:ख दिलं; अशा सर्व ज्ञात-अज्ञात आत्म्यांची मन:पूर्वक क्षमा मागायची. ज्यांच्यामुळे आपल्याला त्रास झाला अशा सर्व आत्म्यांना आपण मन:पूर्वक क्षमा करायची; आणि मग, सर्वांचं शुभ चिंतित प्रेम, शांती, शक्ती - ज्या गुणांचा सकाश द्यायचा असेल त्याच्या शुभलहरी स्वत:च्या आत्म्यामधून प्रदीर्घ गोलाकार तरंगांत, प्रसारित करायच्या, ज्या आपल्यापासून दाही दिशांना पसरत जातील.**

ज्या गुणाचा सकाश द्यावयाचा **आहे, त्या गुणाने किंवा गुणांनी आपण स्वत:स आधी भरपूर भरून घ्यायचं असतं, त्याशिवाय त्याच्या लहरी आपणापासून निघणार कशा? समजा सुखाचा सकाश द्यायचा आहे तर आपण आधी सुखस्वरूप झालं पाहिजे. तशी अनुभूती घेतली पाहिजे. दुसऱ्यांच्या दु:खानं आपण व्याकुळ व्हायचं नाही ही दुसरी अट!** शांत राहूनच सकाश द्यायचा. नाहीतर देताच येणार नाही.

तसंच, दुसरी पद्धत अशी की, शरीर निश्चल स्थितीत बसल्या जागी ठेवून आपण, ‘आत्मा म्हणजे प्रकाश’ बिंदुरूपात अलगद बाहेर निघायचं, (भृकुटी मध्यातून) देवदूताचा प्रकाशमय देह धारण करायचा. बाहेर पडून प्रथम खाली बसलेल्या आपल्याच देहाला वीसएक सेकंद सकाश द्यावा. नंतर आकाशात भरारी घ्यायची. प्रकाश देहाच्या भृकुटीमधून तसेच दोन्ही डोळे, दोन्ही तळहात, यामधून अतिशय प्रखर, शक्तिशाली असे ‘सर्चलाइट्’ सारखे प्रकाश झोत देत, अंतराळातून भ्रमण करायचे. एखादं जंगल जळतंय त्याला जलसिंचनाचा शीतल सकाश द्यावा. एखाद्या ठिकाणी भूकंप झालाय. तिथे धैर्य, शांती, सद्भाव, सहाय्याचा सकाश द्यावा.

आज जगात दु:खाला पारावार नाही. दैन्य, दु:ख, दारिद्र्य याचे चटके खाणारे किंवा राजमहालात राहूनही तगमगणारे, सर्वांनाच शांतीचा सकाश द्यावा. सर्व तहानलेल्या-भुकेलेल्यांना, गरजूंना अन्न, पाणी, वस्त्र, निवारा, औषधोपचार मिळालेला आहे, असं मन:चक्षूंनी पाहावं. यानंतर पुनश्च बिंदूरूपात येऊन, पृथ्वीवर आपल्या ठिकाणी निश्चल बसलेल्या स्वत:च्या शरीराला पुनश्च एकवार सकाश देऊन मग मस्तकात अलगद प्रवेश करावा. सर्वांना सकाश दिल्याचं सात्विक समाधान अनुभवावं.

**अशाप्रकारे इतरांना सकाश देण्याला ‘मन्सा सेवा’ मनाद्वारे दिलेली सेवा म्हणतात. निकटच्या भविष्यात जेव्हा मानवनिर्मित वा निसर्ग निमित्त, संकटं कोसळणार आहेत, तेव्हा या ‘मन्सा’ सेवेचा जगाला अतिशय उपयोग होणार आहे. तेव्हा ही सेवा करण्याचा सराव प्रत्येकानं करण्याची फार मोठी आवश्यकता आहे. हे आपल्याला ‘परमात्मा’ आणि सर्वच वरिष्ठ दादी वारंवार सांगत आहेत.**

■

---

पान ५ वरून

**जरासुद्धा साधारणता नको. सदा श्रेष्ठता हवी. कुठलीही गोष्ट दहा वेळा रिपीट करत बसू नका. त्याने तुमचा वेळ वाया जातो.** जी गोष्ट होऊन गेली; मग ती तुम्ही केली वा दुसऱ्याने केली तरी तिचे चिंतन पुन्हा-पुन्हा करत बसू नका. तरच ज्ञान, योग, धारणा व सेवा या चारही विषयात चांगले मार्कस् मिळतील.

ज्ञान हे केवळ दुसऱ्यांना सांगण्यासाठी नाही. तर ते आपल्या प्रत्येक कर्माद्वारे दुसऱ्यांना मिळाले पाहिजे. आपले बोलणे-चालणे, खाणे-पिणे, उठणे-बसणे... प्रत्येक कर्म ज्ञानयुक्त असले पाहिजे. आपले हसणे देखील ज्ञानयुक्त असले पाहिजे. योगी सदा शांती, सुख, प्रेम, आनंद... या सातही गुणांच्या अनुभूतीत मग्न असला पाहिजे. तो हे सृष्टी नाटक सदा साक्षी होऊन पाहिल. **गीतेतही म्हटले आहे की हे अर्जुन, कुणाचा दोष नाही. प्रत्येक आत्मा आपल्या स्वभावाच्या वश आहे. परंतु आता आपण असेही म्हणणार नाही. आपण हेच म्हणू की हा जरूर बदलेल. ही काही फार मोठी गोष्ट नाही. कारण ही विश्वपरिवर्तनाची पावन, मंगल बेला आहे. तात्पर्य म्हणजे आपण कुठेही गेलात तरी मधुबनसारखे शक्तिशाली वायुमंडल बनवा. हे सुद्धा फार मोठे पुण्य कर्म आहे.**

■



# ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

- ब्र. कु. रमेश शाह, मुंबई (गावदेवी)

ईश्वरीय सेवेची मुख्य तीन साधने आहेत. तन, मन आणि धन. या तिन्ही गोष्टी आपापल्या स्थानी अतिशय आवश्यक आहेत.

कुणी म्हटले आहे की, जेथे आपले धन असेल, तेथे आपले मन असेल. धनाच्या माध्यमातून ईश्वरीय सेवा होऊ शकते. 'पवित्र धन' या पुस्तकात मी बऱ्याचशा गोष्टी धनाविषयक लिहिल्या आहेत. शिवबाबांनी पवित्र धनाचे अर्थशास्त्र सांगितले आहे. **बाबांनी म्हटले आहे की, 'कम खर्च बालानशिन' म्हणजे कमीत कमी खर्चामध्ये अधिकाधिक काम करणे. हा सिद्धांत सर्व गोष्टींसाठी लागू आहे. मनात चालणाऱ्या व्यर्थ संकल्पांवर ही लक्ष द्यायला हवंय. तेही कमी खर्च केले पाहिजेत. त्याचप्रमाणे वेळेचा खजिना, श्वासांचा खजिना इत्यादी खजिने म्हणजेच धन कधीही व्यर्थ घालवू नये. शास्त्रांमध्ये १४ प्रकारचे धन सांगितले आहे. त्यात चारित्र्य सर्वश्रेष्ठ धन म्हटले आहे. समय सुद्धा श्रेष्ठ धन आहे.**

सन १९६९ च्या शेवटच्या पंधरवड्यात प्रकाशमणी दादीजी जेव्हा मधुबनमध्ये आल्या होत्या. तेव्हा ब्रह्माबाबांनी दादीजींना समोर बसवून, बरेच काही धनविषयक समजावून सांगितले होते. बाबांनी दादीजींना सांगितले होते की, समर्पित वत्ससुद्धा धनार्जन करून सेवा करू शकतात. त्यावर दादीजींनी बाबांना विचारले की, ते कसे?' तेव्हा व्यवहारातील एक उदाहरण समोर ठेवित बाबा म्हणाले की बच्ची, हा शिवबालक जसे गायी सांभाळतो (जे आता पांडव भवन, दिल्ली येथे राहत आहेत.) समजा, गायी रोज २० लिटर दूध देतात व त्यांना सांभाळण्याचा खर्च २० रू. आहे. समजा, गायीच्या त्या दूधाची किंमत सुद्धा २० रू.च आहे. म्हणजे उत्पन्न आणि खर्च एक समान झाल्यास, शिवबालकाच्या नावे काहीच जमा होणार नाही. परंतु जर २० रू.च्या खर्चामध्ये २५ लिटर दूध मिळाल्यास ५ रू.चा नफा ड्रामानुसार शिवबालकाच्या नावे जमा होईल. कारण की, शिवबाबा अभोक्ता आणि ड्रामा निष्पक्ष आहे. मग दादीजींनी विचारले की, जर समजा, २० रू. च्या खर्चामध्ये, १५ लिटर दूध आले तर ५ रू. तोटा मग शिवबालक याच्या खात्यात जाणार का? त्यावर बाबा म्हणाले की, स्वाभाविकपणे नुकसान सुद्धा त्याच्या खात्यावर जाणार. ब्रह्माबाबा आणि दादीजींचा संवाद ऐकून मी त्यावर चिंतन केले. आपल्या सर्वांच्याच हातात कार्यव्यवहार आहे आणि त्यात धनाचा उपयोग करावा लागतो. जर आपण यज्ञाच्या कारभारात त्रुटी ठेवली वा काही गडबड केली तर, त्यापासून होणारे नुकसान आपल्या खात्यामध्ये लिहिले जाईल आणि आपण जर मेहनत करून वा तोलून-मापून किंवा योग्य भाव करून खर्च कमी केला तर ती सारी जमेची पूंजी म्हणून, आपल्या खात्यामध्ये जमा होईल. म्हणून यज्ञाचा कारभार करताना कमीत कमी खर्चामध्ये अधिकाधिक काम करण्याचा पुरुषार्थ करायला हवा. बाबांच्या सर्व सेवाकेंद्राच्या निमित्त भगिनी या गोष्टीला चांगल्या प्रकारे जाणून आहेत आणि त्यांनी त्याबाबत अधिक चांगल्या प्रकारे मनन-चिंतन केले पाहिजे.

आपले भाऊ-भगिनी आपल्या अथक सेवेने आपापल्या सेवाकेंद्रावर चांगल्यात चांगले स्थान आणि साधनं बनवित आहेत. कारण जितके चांगले स्थान बनेल, चांगली सेवा होईल. काही भगिनी तीर्थस्थानी सेवा करण्याचे ध्येय ठेवतात; जेणेकरून यात्रेकरूंना बाबांचा संदेश मिळेल. उदाहरणार्थ, अलाहाबाद येथे १२ वर्षांतून एकदा कुंभमेळा होतो. परंतु अन्य वर्षी माघ मेळा इ. होतो. त्यामध्ये ही खूप सेवा होते. हरिद्वार, उज्जैन तथा नाशिकमध्ये जे कुंभमेळे होतात, तेथेही चांगली सेवा होत असते. धार्मिक स्थानी आपल्या भगिनी मोठमोठ्या संत-महात्म्यांची सेवा इतक्या चांगल्या प्रकारे करतात की, महात्म्यांच्या मनात परमात्मा शिवबाबांप्रति श्रद्धा व सद्भाव जागृत होतो. एका साकार मुरलीमध्ये बाबांनी म्हटले आहे की, जर तुमच्याकडे स्वत:साठी व परिवाराच्या खर्चासाठी पर्याप्त धन असेल तर, अधिक धन प्राप्त करण्यासाठी वेळ घालवू नका. कारण त्यामुळे आध्यात्मिक उन्नतीसाठी तुम्ही

वेळ देऊ शकत नाही.

एक ब्रह्माकुमार भाऊ गिरीधारीचा अनुभव सांगत आहे. त्यांनी शरीर सोडल्यावर त्यांच्याप्रति भोग लावण्यात आला होता. तेव्हा ते संदेशीच्या शरीरात आले आणि रडू लागले. ते म्हणाले की, शरीर सोडल्यानंतर ते सूक्ष्मवतनमध्ये बापदादांजवळ गेले अन् त्यांना म्हणाले की, मी करोडपती आहे तर माझा पुढील जन्मसुद्धा जरूर करोडपतीच्या घरातच असेल. **त्यावर बाबा म्हणाले की, तू करोडपती होतास, आता नाही. कारण तू शरीर सोडलेले आहे आणि तुझ्या संपत्तीचे मालकसुद्धा तुझी मुले बनली आहेत, बाबा नाही. तू जिवंतपणी आपले धन बाबांच्या यज्ञात सफल केले नाही. म्हणून मी तुला आता साधारण जन्म देणार.** तो भाऊ मला म्हणाला की, रमेशभाई, माझ्यासारखा अभागी या दुनियेत नाही. कारण मी करोडपती पासून आता रोडपती बनलो आहे. माझा हा दु:खद अनुभव तुम्ही सर्वांना जरूर सांगा आणि म्हणावं की, जितके शक्य होईल, तितके आपले धन जिवंतपणीच ईश्वरीय सेवेत सफल करा व आपले श्रेष्ठ भाग्य बनवा.

तसेच एक राधे माता, जी बालविधवा होती. मुंबईच्या वाटर्लु मेंशन सेंटरवर येत असे. ती आपल्या नातेवाईकांसह रहात होती. तिच्याजवळ तेव्हा १२०० रू. होते. तिने लिहून दिले होते की, माझे शरीर सुटल्यानंतर हे १२०० रू. बाबांच्या यज्ञात जमा करावेत. राधे माताने जेव्हा शरीर सोडले व ती अव्यक्त बापदादांजवळ गेली तेव्हा बाबा तिला म्हणाले की, बच्ची, तुझा जन्म एका मोठ्या रॉयल फॅमिलीमध्ये होईल. तेव्हा तिला खूप आश्चर्य वाटले व तिने बाबांना विचारले की बाबा, ना मी एवढी सेवा केली आणि ना माझ्याकडे एवढे धन होते. मग कसे काय तुम्ही मला रॉयल फॅमिलीमध्ये पाठवित आहात? **त्यावर बाबा म्हणाले की, बच्ची तू नष्टोमोहा होतीस. तू परिक्षेत पास झालीस. तुझ्याजवळ जे काही धन होते, ते शंभर टक्के बाबांच्या कार्यात खर्च केलेस.** या गोष्टींपासून आपल्याला हे शिकायला मिळते की, आपल्याजवळ किती धन आहे. हे जितके महत्त्वपूर्ण असते, त्याबरोबर बाबांच्या यज्ञात त्याचा किती हिस्सा आपण सफल करतो, हे ही अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

आपण सारे जाणतो की, सिकंदरने जेव्हा बाबीलोन येथे शरीर सोडले तेव्हा त्याचे दोन्ही हात कफनच्या बाहेर ठेवण्यात आले. कारण त्यांनी मरणापूर्वी सांगितले होते की, मी आपले इतके मोठे साम्राज्य स्थापन केले. त्याच्यासाठी एवढ्या लढाया लढलो आणि अनेकांचे शिरच्छेद केले. परंतु आता जेव्हा मी शरीर सोडत आहे, तेव्हा माझ्या बरोबर काहीही जात नाही. तेव्हा सिकंदराप्रमाणे, गिरीधारीभाई समान आपण रिकाम्या हाताने जायला नको; **परंतु आपले श्रेष्ठ भाग्य बनविण्यासाठी विविध प्रकारचे धन यज्ञात जमा करणे गरजेचे आहे. त्यासाठी तन-मन-धन तिन्ही द्वारा सेवा करायची असते. सर्वांत अधिक सेवा तनाच्या माध्यमातून करता येते. यामुळे आपले तन सफल होते. मग मनाद्वारे मन्सा सेवा केल्यामुळे मन सफल होते आणि तिसरे धनाद्वारे सेवा करू शकतो. या तिन्ही गोष्टी यथाशक्ती आहेत.** कुणी असा समज करू नये की, मला तर फक्त खूप धन कमवून आपले भाग्य बनवायचे आहे. भाग्य बनविण्यासाठी तर श्रेष्ठ पुरुषार्थ व समर्पण भाव असणे गरजेचे आहे. त्यातच या तिन्ही सेवांचा समावेश होतो.

यज्ञ कारभारामध्ये बचतीबाबत खूप ध्यान ठेवावे लागते. म्हणून बाबांनी मधुबनमध्ये डिपार्टमेंटस बनविले आहेत. जर डिपार्टमेंट नसते तर बाहेरच्या लोकांकडून अनेक कामे करून घ्यावी लागली असती आणि बेहिशेबी खर्च झाला असता, उदाहरणार्थ, बाबांनी यज्ञामध्ये लिगल डिपार्टमेंट बनविले आहे, यज्ञात जी काही अचल संपत्ती घेतली जाते, त्याबाबतचा कारभार लिगल डिपार्टमेंट द्वारा केला जातो. जर हे डिपार्टमेंट नसते तर अचल संपत्तीच्या किंमतीच्या ५% अधिक खर्च करावा लागला असता किंवा त्यापेक्षा अधिक सुद्धा. त्याचप्रकारे बाबांनी साबण बनविण्याचे डिपार्टमेंट बनविले आहे. जेथे २५% खर्चामध्ये सर्फ पावडर आणि कपडे धुण्याचा साबण बनविता येतो. तसेच त्याची क्वालिटी बाहेरच्या साबणापेक्षा अधिक चांगली असते. यालाच बापदादा म्हणतात की, ईकॉनामी व एकनामी. ईकॉनामीसाठी बाबांनी आपल्याला अनेक प्रकारच्या बचतीच्या योजना सांगितल्या आहेत. अज्ञानकाळात मी समजत होतो की, हॉटेलमध्ये जाऊन खाल्ले पाहिजे. तसेच, सिनेमासुद्धा पाहायला पाहिजे. रविवारी सायंकाळी मी घरी भोजन करीत नसे. परंतु बाबांचा बनल्यानंतर तो खर्च खर्च वाचला गेला आणि ती बचत बाबांच्या सेवेत सफल झाली. अन्यथा १९६०पूर्वी माझा दरमहा पॉकेट खर्च ८०० रू. पेक्षा अधिक होत असे.

याच संदर्भात दादीजींच्या एका अमृतवचनाची आठवण होत आहे की, "There is enough in the world to satisfy the need of the people but not

▶ पान २९ वर



# राजयोग, त्रिनेत्री मानव आणि विज्ञान

- ब्र. कु. डॉ. दिलीप कौंडिण्य (एम्.डी.), ठाणे

राजयोग हा सर्व आत्म्यांचे परमपिता शिव परमात्मा यांनी प्रजापिता ब्रह्मा यांना माध्यम बनवून, सांगितलेले आध्यात्मिक ज्ञान आहे. मी जगप्रसिद्ध जे.जे. हॉस्पिटलमध्ये सेवारत असतांना, सतत २१ वर्षे राजयोगाचा अभ्यास केला. तसेच यथाशक्ती ईश्वरीय सेवा केली. सद्यस्थितीत सदर हॉस्पिटलच्या परिसरात शिवबाबांची कुटी तसेच एक सुंदर पीस पार्क आहे. या हॉस्पिटलमध्ये देशाच्या वेगवेगळ्या भागातून रुग्ण, उपचारासाठी येत असतात. **येथे अद्ययावत यंत्रसामुग्री आहे. त्यात कित्येक करोड रूपये खर्चून घेतलेले एक अद्वितीय यंत्र आहे. सदर यंत्राद्वारे राजयोग किंवा अन्य ध्यान प्रकाराचा नियमित अभ्यास केल्याने, निर्माण होणाऱ्या संजीवनी स्त्रावाचे मोजमाप करता येते.** हा संजीवनी स्त्राव वार्धक्य लवकर येणार नाही तसेच नेहमीच उर्जा, आनंद व उत्साह कायम राहिल, अशी व्यवस्था करतो. असाध्य रोग होऊ देत नाही. तसेच ज्यांना झाले असतील त्यांना बरे वाटते. **अशारितीने राजयोग हे ईश्वरीय वरदान आहे; असे जे. जे. हॉस्पिटलमध्ये झालेल्या संशोधनाद्वारे सिद्ध झाले आहे.** परंतु आधुनिक वैद्यकशास्त्र आध्यात्मिक औषधशास्त्राला (स्पिरीच्युअल मेडिसिन) स्युडोसायन्स मानते. त्याचबरोबर आधुनिक वैद्यकशास्त्र केवळ प्रयोगजन्य पुरावाच मानते. अनुभवजन्य पुराव्याला म्हणजे वैयक्तिक पातळीवरच्या अनुभवाला तेथे कसलेच महत्त्व नाही. उदाहरणार्थ, साखर गोड आहे, हे सिद्ध करण्याकरिता फक्त ती तोंडात ठेवावी लागते. अनुभवाने ते सिद्ध होते. परंतु साखर गोड आहे हे आधुनिक उपकरणाद्वारे अद्याप सिद्ध करता आलेले नाही. तात्पर्य म्हणजे कोणत्याही शिक्षण पद्धतीत अनुभवाला श्रेष्ठ मानणे उचित आहे. त्याआधारे आपण राजयोगाच्या आध्यात्मिक ज्ञानाची यथार्थता प्रस्तुत लेखात समजावून घेऊ या-

त्रिकालदर्शी शिवबाबांना हे माहीत आहे की आजचा माणूस बरेच ऐकून, वाचून आणि शास्त्रात काय दिले आहे; हे समजून घेण्याचा प्रयत्न करून थकून गेला आहे. सबब शिवबाबांनी राजयोगाचे आध्यात्मिक ज्ञान अगदी मोजक्या शब्दात व मुद्देसूद असे दिले आहे. फक्त ते नीट समजून घेऊन शेवटच्या क्षणापर्यंत आपल्याला पुरुषार्थ करायचा आहे. मी आत्मा एक चैतन्य ज्योतिबिंदू आहे. मी शरीर नसून, एक आत्मा आहे. मी आत्मा अजर, अमर व अविनाशी आहे. माझे शरीर नश्वर आहे. शरीर एक वस्त्र आहे. ड्रामामध्ये जशी आत्म्याची भूमिका असेल त्याप्रमाणे आत्मा शरीररूपी वस्त्र परिधान करतो.

परमपिता परमात्मा देखील एक दिव्य ज्योतिबिंदू आहे. तो रूपाने बिंदू आहे. परंतु दिव्य गुण, शक्ती, सुख आणि प्राप्ती यांचा सिंधु आहे. **राजयोगाच्या अभ्यासाने अर्थात स्वत:ला आत्मा समजून, त्याची प्रेमाने आठवण केल्यास, आपले विकर्म भस्म होतात व आत्मा पावन देवात्मा बनतो. सत्ययुगात तो देव पद प्राप्त करतो. तसेच राजयोगाच्या अभ्यासाने संगमयुगात तो विकर्माजीत, मायाजीत व मोहजीत होतो. पण या सर्वांकरिता एकच अट आहे, ती म्हणजे पवित्रतेची धारणा करणे.** संकल्प व स्वप्नात देखील अपवित्रता येऊ न देणे, सर्व आत्म्यांविषयी नेहमीच शुभचिंतन करणे. अन्य आत्म्याचे पतित संस्कार व दोष हे ड्रामा अनुसार पूर्व निर्धारित आहेत. त्यामुळे त्यांना दोष न देता, त्यांचे मूळ अनादि संस्कार सदैव पाहणे. स्वत: अशरीरी स्वरूप धारण करून, अन्य आत्म्यांना मस्तकमणी स्वरूपात पाहणे. संगमयुग हे केवळ एकच युग आहे, ज्यात चढती कला होते व सर्वांचे कल्याण होते. तसेच संपूर्ण कल्प फक्त पाच हजार वर्षांचे आहे, लाखो वर्षांचे नाही. आध्यात्मिक ज्ञान इतक्या सार रूपात आजपर्यंत कोणीच सांगितले नव्हते. त्याचबरोबर विधीपूर्वक श्रीमताचे पालन केल्यास याच जन्मी, घोर कलियुगात शेवटपर्यंत स्वस्थ शरीर, उर्जापूर्ण शरीर लाभेल; अशी हमी आजवर कोणीच दिली



**राजयोगाच्या अभ्यासाने, आपल्या विकर्मांचा विनाश होतो व आत्म्याला स्वास्थ्य (Health), संपत्ती (Wealth), खुशी (Happiness) प्राप्त होतो. त्यामुळे प्रत्येकाने राजयोगाचा अभ्यास अवश्य करावा.**

नव्हती.

## राजयोगामधील अध्यात्म व वैज्ञानिक तथ्य–

आपण जाणतो की आत्मा दोन्ही भुवयांच्या मध्ये निवास करतो. या जागेच्या मागे मेंदू व पीनीयल ग्रंथी असते. तिला आज डॉक्टर मंडळी 'गॉडस् स्पॉट' असे म्हणू लागली आहेत. **आता ते मान्य करीत आहेत की आत्मा या पीनीयल ग्रंथी मध्ये निवास करतो. योग विद्या या स्थानाला 'तिसरा नेत्र' (Third Eye) असे मानते. तसेच या स्थानात आज्ञाचक्र असते, अशीही मान्यता आहे. म्हणजेच आपल्यापैकी प्रत्येक जण शंकरासारखा त्रिनेत्री आहे. ज्ञानसागर शिव परमात्म सत्य ज्ञान प्रदान करून, आपला हा तिसरा नेत्र उघडतात. तेव्हा विश्व जळून खाक होत नाही तर आपले विकार व वासना भस्म होतात.** जेव्हा सर्व आत्म्यांच्या जुन्या संस्कारांची आहुति पडते, सर्वच्या सर्व जुने संस्काररूपी तीळ योग अग्नीत जळून खलास होतात; यालाच जगाचा विनाश होतो, असे म्हटले जाते. जगबुडी वगैरे होत नाही. परंतु महाभारी विनाशानंतर एक नवीन युगाची, सत्ययुगाची स्थापना होत असते.

पीनीयल ग्रंथी म्हणजे एक चमत्कार आहे. ही ग्रंथी चारही बाजूंनी मेंदूच्या पेशींद्वारे वेढलेली आहे. म्हणजेच ती पूर्णपणे अंधारात असते. तरीदेखील तिची रचना मानवी डोळ्यासारखी आहे. संपूर्ण अंधारात या ग्रंथीला दिसतं तरी काय हे एक गूढ आहे. ग्रीक, इजिप्शियन आणि अन्य कित्येक संस्कृती या ग्रंथीला 'परमेश्वरी एन्टीना' असे मानतात. त्यांची मान्यता आहे की परमेश्वराच्या संदेशवाहकात सदर ग्रंथी मोठी आणि वजनाने जास्त असते. या ग्रंथीद्वारे संदेशी परमेश्वराचे संदेश कॅच करतो. इजिप्शियन ममीच्या शव विच्छेदनातून उपरोक्त बाब सिद्ध झालेली आहे.

सन १९९४ पर्यंत या ग्रंथीचे नेमके कार्य काय आहे; हे माहीत नव्हते. आता कळले की सदर ग्रंथीमधील एक स्राव (मेकाटोनिन) हा गाढ झोप लागण्याकरिता महत्त्वाचा आहे. गाढ निद्रेच्या तिसऱ्या अवस्थेत माणूस मेल्यासारखाच असतो. योग विद्येत अशी मान्यता आहे की गाढ झोपेत आत्मा एका विशिष्ट 'कॉस्मिक एनर्जी झोन' मध्ये प्रवेश करतो आणि आपली बॅटरी चार्ज करतो. अमेरिकन डॉक्टर सदर उर्जेला 'लाईफ फोर्स एनर्जी' म्हणजे 'प्राण' असे म्हणतात. तसेच राजयोगाच्या एका विशिष्ट फेजमध्ये कित्येक साधकांच्या मूलाधार चक्रात प्रकंपने जाणवतात. अमेरिकन डॉक्टर या अंतरिक्षातून प्राप्त होणाऱ्या उर्जेच्या प्रकंपनांना 'कॉस्मिक हीलींग वायब्रेशनल व्हीस्पर' असे म्हणतात. सदर प्रकंपने शरीरातील 'अल्ट्राडियन रिदम' म्हणजेच 'प्राणिक हीलींग' यंत्रणेला जागृत करतात. यामुळे 'संजीवनी स्राव' निर्माण होतो व हा स्राव शरीराच्या विभिन्न पेशींमधील सर्व झीज भरून काढतो. परिणामत: माणसाला खूपच ताजेतवाने वाटते. यालाच आपण राजयोगाद्वारे 'आत्म्याची बॅटरी चार्जिंग' असे म्हणतो. वैज्ञानिक दृष्ट्यादेखील ते योग्य आहे. पवित्रतेची धारणा जशी-जशी पक्की होत जाते, तेव्हा माणसाला एक आत्मिक आकर्षण प्राप्त होते. यालाच 'ओजस' असे म्हणतात.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आले असेल की राजयोगाच्या अभ्यासाने, आपल्या विकर्मांचा विनाश होतो व आत्म्याला स्वास्थ्य (Health), संपत्ती (Wealth), खुशी (Happiness) प्राप्त होतो. त्यामुळे प्रत्येकाने राजयोगाचा अभ्यास अवश्य करावा. राजयोग खऱ्या अर्थी ईश्वरीय वरदान आहे. याचा प्रत्येकाने लाभ घ्यावा. याच अनुषंगाने एक सुंदर हिंदी फिल्मचे गीत आहे-

'लाख दु:खों की एक दवा है, क्यूँ ना आजमाए ।'

वाचक बंधुंनो, शंका, कुशंका इत्यादी सोडून राजयोगाचा विधीपूर्वक अभ्यास करून, जीवनात काय चमत्कार घडतात, याचा स्वत: अनुभव घ्या आणि स्वत: खात्री करा. राजयोग हीच खरी संजीवनी बुटी आहे, ज्याच्या अभ्यासाने 'संजीवनी स्राव' निर्माण होतो. फलस्वरूप आपण सर्व व्याधींपासून मुक्त अर्थात प्रकृतीजीत बनतो. ■

# वास्तविकता जीवनाची

- ब्र. कु. बाळूभाई, शांतिवन (आबू रोड)

प्रत्येक जण आपल्या पूर्वकर्मानुरूप जन्म घेत असतो. पण शेवटी काळाच्या मुखी जाऊन पडतो. मृत्यू कोणालाही सोडत नाही. परंतु मृत्यूनंतर लोकांच्या हृदयात स्थान बनविणे, हे मात्र आपल्या श्रेष्ठ कर्मांवर आधारित आहे. याअनुषंगाने समर्थ रामदासांचा अतिशय सुंदर श्लोक आहे -

**देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी।**
**मना सज्जना हेचि क्रिया धरावी।**
**मना चंदनाचे परि त्वां झिजावे।**
**परी अंतरी सज्जना नीववावे ।।**

(भावार्थ : हे मना! जन्मभर अशी सत्क्रिया करावी की, देहत्यागानंतर लोक आपली कीर्तीच गात राहतील. स्वत: काया-वाचा-मने परोपकारार्थ चंदनासारखे झिजावे पण सज्जनांना अंतरी संतोषवावे.)

एकदा एक संत आपल्या शिष्यांना प्रश्न विचारतात, जीवनात सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती, जिच्यासाठी मनुष्यमात्र जीवन जगत आहेत? सर्वांनी वेगवेगळी उत्तरे दिली. कुणी सांगितले. पैसा मिळवणे, मुलांचे शिक्षण करणे, स्वत:चे घर असणे, आई-वडिलांची सेवा करणे, परिवाराला आनंद देणे, कोणत्या तरी क्षेत्रात नाव कमविणे, तर काहींनी ईश्वराच्या भक्तीला जीवनात सर्वांत महत्त्वाचे स्थान दिले. आता आपण विचार करा की यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे का? का याव्यतिरिक्त अजून काही आपल्या



जीवनाची वास्तविकता आहे?

**आपल्या दैनंदिन जीवनात सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपण अनेक कर्म करतो. परंतु सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे मी एक सदाचारी व्यक्ती आहे, ही ओळख समाजाला करून देण्यासाठी, जीवनात सदैव श्रेष्ठ कर्म करणे. जेव्हा मनुष्य दिव्य गुणांच्या आधारे कर्म करतो, तेव्हा त्याला जीवनात प्रतिष्ठा, प्रेम, पैसा इत्यादी सर्व गोष्टी आपोआप प्राप्त होतात.** एवढंच नव्हे तर आपले कर्म जन्म-जन्मांतर आपल्याबरोबर असतात. (याउलट मृत्युनंतर शरीराचे अवयव मात्र अगदी थोड्या काळासाठी कार्यशील रहातात वा साथ देतात. उदाहरणार्थ हृदय (१० मिनिट), मेंदू (२० मिनिट), डोळे (४ तास), त्वचा (५ दिवस), हाडे (३० दिवस)). **म्हणूनच प्रत्येकाने 'सत्कर्म योगे वय घालवावे' हीच जीवनाची वास्तविकता होय.** याविषयीची एक उद्‍बोधक घटना आपण पाहू या-

एकदा एक महिला आपली कार घेऊन चालली असता, अचानक ती रस्त्यावर बंद पडली. बरेच प्रयत्न करूनही तिला टायर दुरुस्त करता आले नाही. कुणीतरी येऊन आपली मदत करेल. म्हणून ती वाट पाहू लागली. तेवढ्यात एक मनुष्य तेथून जात होता. महिलेला पाहून तो सायकल वरून उतरला व त्या महिलेकडे जाण्यासाठी निघाला. प्रथम तर त्या महिलेला त्याची भीती वाटली की हा मनुष्य काही नुकसान तर पोहचवणार नाही ना? तेवढ्यात तो मनुष्य त्या महिलेला म्हणाला की मॅडम तुम्ही गाडीमध्ये बसा, बाहेर खूप थंडी आहे. मी बघतो काय प्रॉब्लेम आहे. माझे नाव ब्रायन एंडरसन आहे. हे ऐकून महिलेला थोडा दिलासा मिळाला. एंडरसनने बघितले की गाडीचे टायर पंक्चर झाले आहे. थोड्याच वेळात त्याने टायर बदलले. गाडीतील नवीन टायर टाकले. महिलेला याचा आनंद झाला की मी माझ्या कामावर वेळेवरती पोहचू शकेल. महिलेने एंडरसनला स्वखुशीने १०० डॉलर देऊ केले. त्यावेळी एंडरसन म्हणाला, मॅडम मला तुमचे पैसे नकोत. परंतु जर तुमच्या जीवनात एखादा गरजू मनुष्य आला तर या प्रसंगाची आठवण ठेऊन तुम्ही त्याची अवश्य मदत करा. असे सांगून एंडरसन निघून गेला. महिलेने आपली गाडी चालू केली. गाडी चालवताना तिच्या मनात एकच विचार येत होता की या जगात अशीही माणसे आहेत जी निस्वार्थ

भावनेने दुसऱ्यांची मदत करण्यात आनंद मानतात. या प्रसंगातून त्या महिलेला बोध झाला होता. की जीवनाचे लक्ष्य काय असावे, जीवन कसे जगावे.

वास्तविक प्रत्येकजण आपले बालपण, तरुणपण, म्हातारपण या अवस्थेतून गेल्यावर, एक न एक दिवस तो मृत्यूला भेटणार हे सत्य असूनही, फक्त वेळेची निश्चितता ज्ञात नसल्यामुळे, व्यक्ती मृत्युला सहज स्वीकार करीत नाही. कारण त्याला ती भीती असते की पुन्हा या देहात मी येणार नाही. तसेच पुढची यात्रा कुठून सुरू होणार, हे ही त्याला माहीत नसते. **देहाच्या विषयीची ममता, संबंधितांमध्ये असलेला मोह त्याला सुटत नाही. जिवंतपणी 'मी मी' करत तो जगत असतो. आपण चिरंजीव आहोत, असे समजून तो संसारात दंग होऊन जातो.** तो हा विचारच कधी करत नाही की एक दिवस मला हे सर्व सोडून जायचे आहे. या अनुषंगाने समर्थ रामदासांचा पुढील श्लोक अतिशय अर्थपूर्ण आहे-

**मना पाहता सत्य हे मृत्यूभूमी ।**
**जिता बोलती सर्वही जीव मी मी ।**
**चिरंजीव हे सर्वही मानिताती ।**
**अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।।**

स्वामी विवेकानंदानी देखील सांगितले आहे की जीवनाबरोबर मृत्यूची पण आठवण ठेवा. सुरुवातीला थोडी निराशा वाटेल. परंतु नंतर मात्र आत्म्यामध्ये शक्ती येईल. आज समाजात जो भ्रष्टाचार, पापाचार, अत्याचार, अनैतिकता वाढतांना दिसत आहे; याला मुख्य कारण म्हणजे माणसाला त्याच्या मृत्यूची वेळ माहीत नाही. त्याचबरोबर या जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कर्माची फळे पुढील जन्मात आपल्यालाच भोगावी लागणार आहेत; याचे ज्ञान नाही. जर हे ज्ञान असते तर लोकांनी पापकर्म करणे, सोडले असते.

एकदा एक मनुष्य संत महात्म्याकडे गेला व त्यांना म्हणाला की माझ्याकडे सर्व काही असून देखील, सुख-शांती नाही. तुमच्याकडे मात्र काही नसतांना देखील, सुख-शांती-प्रसन्नता या सर्व गोष्टी कशा काय आहेत? संत महात्म्याने स्मित हास्य केले न म्हणाले, तुझ्या या प्रश्नाचे उत्तर मी दिले असते पण आता वेळ निघून गेली आहे. तू माझ्याकडे फार उशिरा आला आहेस. तुझ्या जीवनाचे फक्त आता ७ दिवसच उरले आहेत. महात्म्याचे हे बोल ऐकताच, तो मनुष्य घाबरून गेला. दुसरे कोणी सांगितले असते तर त्याचा विश्वास बसला नसता. आता तो मनुष्य एकदम बदलून गेला. आपल्या हातून जो वाईट व्यवहार झाला होता, त्याबाबत दुसऱ्यांची माफी मागू लागला. सर्वांशी अतिशय चांगले वागू लागला. बघता-बघता ७ दिवस निघून गेले. परंतु मृत्यू काही आला नाही. म्हणून तो मनुष्य पुन्हा महात्म्याकडे गेला व मागील ७ दिवसाचा सारा वृत्तांत सांगितला. तेव्हा महात्माजींनी विचारले की ७ दिवसात तुझ्या हातून काही पाप झाले का? बिल्कुल पाप झाले नाही, असे तो मनुष्य म्हणाला. **तेव्हा महात्माजी म्हणाले की, जीवनातील सुख-शांतीचे हेच रहस्य आहे. त्यामुळे मृत्यूचे सदैव भान ठेवावे म्हणजे आपल्या हातून पापकर्म कमी होतात व सत्कर्मांचा वा पुण्यकर्मांचा संचय होत जातो. तात्पर्य म्हणजे मृत्यू हा जीवनाचा अंतिम पडाव आहे, हे कधीही विसरता कामा नये -** याविषयी एक शायर म्हणतो- 'मंजिल तो तेरी यही थी। बस, जिन्दगी गुजर गयी तेरी आते-आते । क्या मिला तुझे इस दुनिया से? अपनों ने ही जला दिया तुझे जाते-जाते । हे मानव, तुने रात गँवाई सो के । दिवस गँवाया खा के। हिरा जनम अमोल था, कौडी बदले जाए।'

या नाशवान जगात आपल्याबरोबर काहीच येत नाही. भौतिक सुखाला खूप मर्यादा आहेत. इंद्रियांपासून मिळणारी सुखं क्षणभंगूर आहेत. खरं सुख तर परमात्माच देऊ शकतो, जो सर्व सुखाचा सागर आहे. **त्यामुळे परमात्म्याची प्राप्ती व अविनाशी सुख-शांतीचा अधिकार प्राप्त करणे, हेच आपल्या जीवनाचे वास्तविक ध्येय असले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने आत्मा, परमात्मा व सृष्टिचक्राचे यथार्थ ज्ञान समजून घेतले पाहिजे.** म्हणजे आपले मन व बुद्धी परमात्मा शिव पित्याच्या, मधुर स्मृतीत लवलीन स्थितीचा अनुभव करेल. फलस्वरूप सदा आनंदाची अनुभूती होत राहिल. याचेच गायन आहे-

**अवघाचि संसार सुखाचा करीन ।**
**आनंदे भरीन तिन्ही लोक ।।**

ज्ञानी तू आत्म्याची सदैव हीच धारणा असते की, मी आत्मा खरा संपन्न आहे, संपूर्ण आहे. भरपूर आहे, तसेच सुंदर आहे. या बाह्य जगतातील कुठलीही वस्तू मला आनंद देऊ शकणार नाही. **बाह्य जगातील प्राप्तींनी मी कधीही संपूर्ण बनू शकणार नाही. मी आत्मा मूलत: 'सत्-चित्-आनंद-स्वरूप' आहे. फलस्वरूप तो सदैव आनंदमय (खुशनुमा) जीवनाचा अनुभव करीत असतो. हीच त्याच्या जीवनाची वास्तविकता (सत्यता) असते.**

■

(खास ब्रह्मावत्सांसाठी)



# एक वैश्विक आश्चर्य - चार युगांची अविरत पुनरावृत्ती होत राहणे

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

हा ड्रामा परमात्म्याने बनविला आहे असे म्हटले तर अंतिम समयी परमात्म्याची प्रत्यक्षता झाल्यानंतर कोटी-कोटी भक्त तक्रार करतील की, हे भगवन् तू आमच्यासाठी देवता बनण्याचा ड्रामा का नाही बनविलास? त्यापेक्षाही दु:खद घटना तर हीच आहे की, आम्हाला साकार प्रभू मिलनापासून कल्प-कल्प वंचित ठेवलेस; हे प्रभू, कल्प कल्पांतरासाठी केवळ भक्त बनण्याचीच भूमिका आम्हाला का दिलीस! ह्या भक्तांच्या तक्रारीशिवाय ह्या ड्राम्याविषयी दोन महाप्रश्न निर्माण होतील. पहिला प्रश्न - हा ड्रामा बनविण्यापूर्वी ही पृथ्वी निर्मनुष्य होती काय? दुसरा प्रश्न - अशा निर्मनुष्य स्थितीत आत्मे जर परमधाममधून ह्या पृथ्वीवर आले तर स्त्री पुरुषांच्या शिवाय त्यांचे दैहिक जन्म होणार तरी कसे? त्यासाठी हा सिद्धांत अनिवार्य आहे की, ह्या पृथ्वीवर असा कोणताच काळ व कोणतेच युग असे असू शकत नाही ज्यामध्ये ही मनुष्य सृष्टी अल्पमात्रही नव्हती. अर्थात ती कधी कोटीच्या संख्येत तर कधी अत्यल्प संख्येतही असू शकेल. बंधुनो, चार युगांच्या काळातच नव्हे तर अनंत युगे ही मानवी सृष्टी फिरत होती व अनंत युगे ती फिरतच राहणार आहे. ह्या अनादि चक्रात प्रथम युग कोणते निर्माण झाले? हा प्रश्न निर्माण झाल्यास




अनादि शब्दाविषयी पूर्णत: अज्ञान आहे असे समजावे. म्हणून भगवद्गीतेतही ह्या अनादि मनुष्य सृष्टीविषयी अत्यल्प शब्दांत म्हटले आहे की, पुरुष (आत्मा) व प्रकृती (शरीर) ही दोन्ही अनादि आहेत. **ह्या अनादि जीव सृष्टीचा शोध अनेक वर्षे वैज्ञानिक घेत आहेत, परंतु त्यांना हे ज्ञात नाही की, अनादिचा आदि व अंत कोणीही जाणू शकत नाही. फलस्वरूप त्यांना ही जीवसृष्टी कशी व कधी निर्माण झाली ह्याचा शोध कधीही लागू शकणार नाही. वैज्ञानिक बुद्धी व ईश्वरीय बुद्धी ह्यात महान अंतर आहे.** वैज्ञानिक सिद्धांत कालानुरूप बदलत जातात, परंतु ईश्वरीय सिद्धांत कालत्रयी बदलत नाहीत. म्हणून परमात्म्याने भविष्य वाणी वर्तविली की 'अंतमें सायन्सपर सायलेन्सकी विजय होगी।' वैज्ञानिकांनाही अप्रत्यक्षपणे परमात्म्याला हेच सुचवायचे आहे की, अनादिचा शोध घेणे म्हणजे वेळ व्यर्थ घालविणे आहे. म्हणून प्रथमत: अनादि काय काय आहे, ते जाणून घेवूया. हे चार युगांचे मनुष्यसृष्टी चक्र, ह्या चक्रात पार्ट बजाविणारे मनुष्यआत्मे, पाच तत्वे, पाच तत्वांचे अन्य ग्रह, सूर्य, चंद्र, तारे अनादि व परिवर्तनशील आहेत तर परमात्मा व त्याचे परमधाम अनादि व अपरिवर्तनशील आहे. सूक्ष्म वतन खास संगमयुगासाठी परमात्म्याने निर्माण केले असल्याने ते लोप पावते.

बंधुंनो, आपण सर्वजण परमात्म्याने प्रदान केलेल्या तिसऱ्या व दिव्य नेत्राने हा चार युगांचा संपूर्ण ड्रामा पाहूया. तो पाहताना आत्म्याला असे प्रकर्षाने जाणवेल की, हा ड्रामा सर्वांसाठी कल्याणकारी आहे. ह्या ड्राम्यात प्रत्येक आत्म्याला त्याच्या जन्म संख्येप्रमाणे व त्या जन्म संख्येला लागणाऱ्या काळाप्रमाणे तीन चतुर्थांश सुख व केवळ एक चतुर्थांश दु:ख प्राप्त होते. जे आत्मे संगमयुगावर पूर्णत: जीवनमुक्ती प्राप्त करून सोळा कला संपन्न बनतात ते आत्मे एका कल्पात ८४ जन्म प्राप्त करतात. त्यांचे आरंभीचे २० जन्म निरोगी, निर्विकारी व निर्विघ्न अवस्थेत सत्ययुगी स्वर्गात व त्रेतायुगी सेमी स्वर्गात व्यतित होतात. अर्थात त्यांना ह्या दोन युगात अंशमात्रही दु:ख नसते. पुढील द्वापर, कलियुगात मात्र २५०० वर्षे (६३ जन्मांसाठी) सदरहू आत्म्यांना संमिश्रित असे सुखदु:ख प्राप्त होते. त्याशिवाय संगमयुगावर एका मरजीवा जन्मात सर्वोच्च

**शारीरिक वेदना कितीही झाल्या तरी मनाला वेदना होता कामा नये. हे सूज्ञ ब्रह्मावत्साने जाणण्यासारखे आहे की, मनात निर्माण होणारे दुःखद संकल्प कल्प-कल्प पुनरावृत्त तर होतातच ह्याशिवाय हे संकल्प जीवनमुक्ती व जीवनमुक्त युगापासून दूर नेणारे असतात.**

---

अशा अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते. संपूर्ण कल्पात केवळ आठ दहाजन्म प्राप्त करणाऱ्या आत्म्यांचा सुखदुःखाचा काळ फार तर ५०० ते ६०० वर्षांचा असेल. हे सृष्टिचक्र अन्य धर्मांच्या आत्म्यांच्या तुलनेत बह्मावत्सांसाठी अधिक कल्याणकारी तर कल्पात ८४ जन्म प्राप्त करणाऱ्या नऊ लाख आत्म्यांसाठी सर्वाधिक कल्याणकारी आहे. हे होवनहार देवी देवतांनो, **ह्या संगमयुगावर शिवबाबा आपणा सर्वांना ज्ञानमुरलीद्वारे सत्ययुगी स्वर्गातील श्री लक्ष्मी नारायणाच्या सत्वप्रधान राज्याची व त्या राज्यातील अपार स्वर्गीय सुखांची वारंवार स्मृती देवून, स्मृतीर्लब्धा बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत.** अर्थात ज्या आत्म्यांनी भूतकाळातील कल्पात सत्ययुगी स्वर्गात जन्म प्राप्त केला असेल केवळ त्यांनाच ती स्मृती प्राप्त होईल. जशी स्मृती तशी समर्थी! फलस्वरूप ही स्मृतीच आत्म्याला सत्ययुगी स्वर्गाच्या लायक सोळा कला संपूर्ण बनवेल. आत्मा स्मृती स्वरूप झाल्याने त्याला महान पुरुषार्थ करण्याची व संपूर्ण निर्विकारी बनण्याची प्रेरणा आपोआपच निर्माण होते. **आपला भारत देश सत्ययुगानंतर त्रेतायुगातही संपूर्ण निर्विकारी असल्याने, ह्या दोन्ही युगात २५०० वर्षे भारतवासी देवी देवतांनी स्वर्गीय वैभवाचे अपार सुख प्राप्त केले होते. देवी देवतांचे हे आत्मे दुसरे तिसरे कोणी नसून, संगमयुगावर साधारण मनुष्यरूपात पुरुषार्थ करणारे आपण ब्रह्मावत्सच आहोत.** प्रत्येक संगमयुगावर पुरुषार्थ करून दैवी युगात



प्रदीर्घ काळासाठी स्वर्गीय सुख प्राप्त करणे ही भाग्याची परिसीमा तर आहेच ह्याशिवाय हे सृष्टिचक्र (ड्रामा) पुनरावृत्त होत असल्याने, ह्या पद्मापद्म पूजनीय भाग्याचा अविनाशी छाप कल्प-कल्प ब्रह्मा, सरस्वती व त्यांच्या अलौकिक पुत्रांच्या आत्म्यांवर बसलेला आहे. ह्या कल्पनातीत भाग्यासाठी केवळ हिंदी भाषेतच हे वाक्य म्हणावे वाटते की, 'हमे अपने स्वर्गीय राज्यभाग्यपर नाज है।'

बंधु, भगिनी व मातांनो, आता विचार करा की, लौकिक जीवनात अथवा अलौकिक जीवनात ज्या काही दुर्घटना अथवा शरीराला काही व्याधी झाल्या असतील तर त्या दुर्घटनांना अथवा व्याधींना तुम्ही मनाने कवटाळून बसणार की आपल्या अपार सुख देणाऱ्या दैवी भाग्यासाठी पुरुषार्थ करणार आहात? ह्याचा निर्णय तुम्हालाच घ्यावयाचा आहे. शारीरिक वेदना कितीही झाल्या तरी मनाला वेदना होता कामा नये. हे सूज्ञ ब्रह्मावत्साने जाणण्यासारखे आहे की, मनात निर्माण होणारे दुःखद संकल्प कल्प-कल्प पुनरावृत्त तर होतातच ह्याशिवाय हे संकल्प जीवनमुक्ती व जीवनमुक्त युगापासून दूर नेणारे असतात. शंभर टक्के जीवनमुक्ती प्राप्त करून, **सत्ययुगात १-१-१ ह्या तारखे पूर्वी जन्म घ्यावयाचा असेल तर तीव्र पुरुषार्थ, लक्ष्मी अथवा नारायणी नशा, शक्तिशाली संकल्प, स्वमान, वरदान व ज्वालामुखी राजयोगाचा अभ्यास केल्यास, शक्तिशाली स्थितीबरोबरच महान भाग्यही प्राप्त होईल. त्यासाठी अंतसमयी केवळ आणि केवळ शिवबाबांची अर्थात त्या अति सूक्ष्म दिव्य ज्योतिर्बिंदू परमात्म्याचीच स्मृती येणे आवश्यक आहे.** आपल्या सर्वांना कोणत्या स्वमानांचा अभ्यास करावयाचा आहे हे ज्ञानमुरलीत शिवबाबांनी अनेक वेळा सांगितले आहे. मा. सूरजभाईंच्या एका प्रवचनात अनेक स्वमान असतात. सर्वप्रकारच्या स्वमानांचा, स्वधर्मांचा, स्वचिंतनाचा व परमात्म चिंतनाचा अभ्यास करून, अनेक वेळा प्राप्त केलेले स्वर्गीय राज्यभाग्य पुनश्च प्राप्त करूया. सत्ययुगी स्वर्गात साधारण नरनारींनी देवी देवता बनणे हे कित्येक अज्ञानी आत्म्यांच्या दृष्टीने कल्पना असेल, परंतु ह्या त्यांच्या कल्पनेला साकार करून भारताला प्रत्यक्षात पूजनीय देवी देवतांचा पवित्र स्वर्ग बनवूया आणि ज्यावेळी असा स्वर्ग प्रत्यक्षात साकार होईल; त्यावेळी मात्र त्या स्वर्गाला पाहण्यासाठी सदरहू अज्ञानी आत्मे ह्या स्वर्गीय साकार सृष्टीवर नसतील अर्थात त्यांना तो अधिकारही रहात नाही. तो अधिकार समस्त ब्रह्मावत्सांना परमात्म्याने प्रदान केला आहे.

▶ पान २८ वर

# संघर्षमय जीवनात सफलतेसाठी सकारात्मक विचारांची आवश्यकता

**-ब्र. कु. भगवानभाई, शांतिवन (आबू रोड)**

वर्तमान समयी मानव जीवन हेच मुळी संघर्षमय जीवन बनले आहे. प्रत्येकाच्या जीवनात कोणत्या ना कोणत्या प्रकारचा संघर्ष हा जरुर आहे. जीवनात काही ना काही प्राप्ती व्हावी यासाठी संघर्ष, पद-प्रतिष्ठा प्राप्तीसाठी संघर्ष, स्व उन्नतीसाठी संघर्ष, आपसातील संस्कार मीलनासाठी संघर्ष, वैर-विरोधापासून मुक्त होण्यासाठी संघर्ष, स्वत:ची रक्षा करण्यासाठी संघर्ष, व्याधीमुक्तीसाठी संघर्ष. नुकताच नोटाबंदीमुळे उद्भवलेला आर्थिक संघर्ष... अशा प्रकारचे अनेक संघर्ष चालूच असतात. परिणामत: मनात व्यर्थ विचार येतात. कधी-कधी तर जीवनाचाच कंटाळा येतो. **परंतु सदैव लक्षात ठेवा की जीवनातील हा संघर्ष, उन्नतीचा खरा मार्ग आहे. संघर्षामुळेच व्यक्ती काही ना काही पुरुषार्थ करतो आणि हा पुरुषार्थ त्याच्या सफलतेचा खरा मार्ग बनतो. म्हणून जीवनातील संघर्षाला घाबरण्याऐवजी, त्याचा एक वरदान म्हणून स्वीकार करा. संघर्षमय जीवनात जो मनुष्य सकारात्मक विचार करतो तो नेहमीच सफलता प्राप्त करतो.**

## जीवनातील संघर्ष हा एक शिक्षक आहे

जीवनातील संघर्षामुळेच आपण अनुभवी बनू शकतो. प्रशंसा योग्य बनू शकतो. संघर्षामुळेच आपण सदोदित जागृत राहून, काही ना काही पुरुषार्थ करू शकतो. त्यापासून योग्य तो धडा आपण शिकतो. त्यामुळे जीवनातील



संघर्ष हा एक शिक्षक आहे. संघर्षमय जीवनातून आपण जितके धडे शिकतो तितकीच आपली उन्नती होत जाते व शेवटी आपण आपल्या ध्येयाप्रत पोहोचतो. त्यामुळे जीवनातील संघर्ष हे जणू आपल्यासाठी एक वरदान आहे; असे समजा. त्यातूनच आपल्या भाग्याचे दरवाजे उघडतात. फलस्वरूप आपण भाग्यवान बनू शकतो. तात्पर्य म्हणजे संघर्षमय परिस्थितीला कधीही घाबरू नका. तर तिला धीराने तोंड द्या म्हणजे आपले जीवन धन्य होईल.

## संघर्षमय परिस्थितीत सकारात्मक विचारांचे महत्त्व

संघर्षमय जीवनात सफल होण्यासाठी प्रत्येक जण मार्ग शोधत असतो. त्यासाठी खात्रीशीर एकमेव मार्ग जर कुठला असेल तर तो आहे; सकारात्मक विचारांची सोबत. सकारात्मक विचारांमुळे आपले मनोबळ वा आत्मबळ वाढते. याद्वारेच आपण संघर्षमय परिस्थितीवर विजय प्राप्त करू शकतो. जेव्हा आपण सकारात्मक विचारांची सोबत करतो तेव्हा आपण गुणवान, चरित्रवान व सर्व शक्ती संपन्न बनू शकतो. परिणामी सर्वजण आपली प्रशंसा करू लागतात.

याउलट संघर्षमय परिस्थितीत मनुष्य जेव्हा, नकारात्मक विचारांची सोबत करतो तेव्हा परिस्थिती आणखीनच बिकट होते. अशावेळी तो योग्य निर्णय घेऊ न शकल्याने, दुर्गुणांची सोबत करतो. परिणामी असफल बनतो. नकारात्मक विचारांमुळे शंका, कुशंका, तणाव, ईर्ष्या, द्वेष, घृणा इत्यादी गोष्टी आणखीनच वाढत जातात. त्यामुळे दिवसेंदिवस संघर्ष वाढतच जातो. यातूनच मनाची शांती भंग पावते व मनुष्य मानसिक व शारीरिकदृष्ट्या कमजोर बनत जातो. तो नेहमीच दुसऱ्यांच्या कमी-कमजोरीचे वर्णन करत असतो. त्याच्या मनातील वैरभाव, ईर्ष्याभाव हा वाढतच जातो. परिणामी त्याचा दुसऱ्यांशी व्यवहार सुद्धा नकारात्मक बनत जातो. त्यामुळे तो जीवनात दु:खी, अशांत, चिंताग्रस्त राहिल्याने असफल बनतो. यावरून आपल्या लक्षात येईल की संघर्षमय जीवनात सफल होण्यासाठी, सकारात्मक विचारांची आवश्यकता आहे.

## जीवनातील संघर्ष हाच उत्कर्षाचे साधन

सकारात्मक विचार करणारा मनुष्य, हा समस्येविषयी विचार करत नाही. परंतु तो समस्येचे समाधान कसे होईल; याचा विचार करतो. तो नेहमी आपल्यातील योग्यता, क्षमता ▶ पान २९ वर



# अध्यात्म आणि महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या

-ब्र.कु. विठ्ठल दा. सावकार, नाशिक

भारत हा कृषिप्रधान देश असून, जवळ जवळ ७०% लोक शेती हा व्यवसाय करतात. मुख्यत्वे शेतीवरच देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. अन्नदात्या शेतकऱ्यांच्या काबाडकष्टातून चांगले शेती उत्पादन मिळते; जे मानवाची महत्त्वाची मुलभूत गरज पूर्ण करते. प्राचीन काळापासून मानवाचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. त्या आधारेच भारतातील सण, उत्सव निर्माण झाले आहेत. शेतीच्या माध्यमातूनच भारतीय संस्कृतीचा उगम झालेला आहे.

देशात सहा लाखांहून अधिक खेडी आणि ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आजही खेड्यात रहाते. अर्थात, खरा भारत खेड्यातच रहातो, तेव्हा खेडी स्वच्छ, स्वयंपूर्ण झाल्याशिवाय किंवा शेतकरी स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देशाचा विकास झाला, असे म्हणणे चुकीचे ठरेल. खरेतर हा संदेश महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच दिला होता. **परंतु नियोजितपणे गावाचा विकास झालाच नाही आणि गाव आणि शहरे यातील दरी वाढतच गेली. विशेष म्हणजे हे अजूनही चालू आहे.**

शेती हा शेतकऱ्यांचा केवळ व्यवसाय नसून संस्कृती आहे. ही संस्कृती तो आजतागायत जपत आला आहे. शेतीत अपार कष्ट करून तो केवळ आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवत नाही, तर संपूर्ण जगाची भूक भागवितो. मात्र त्याचा हा आधार हळूहळू तुटत चालला आहे. शेतीवर कुटुंबाचे उदरपोषण नीट होत नाही, मुलाबाळांचे शिक्षण, लेकीबाळीचे लग्न, कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य या जबाबदाऱ्या त्यास सक्षमतेने पेलता येत नाहीत. **त्यातच सावकार अथवा बँकेचा कर्ज वसुलीचा तगादा अशा दृष्टचक्रात तो अडकला आहे. आर्थिक आणि मानसिक दृष्ट्याही खचलेला आजचा शेतकरी हताश, निराश असून तणावग्रस्त जीवन जगत आहे.**

याचाच परिणाम म्हणून राज्यात मागील सुमारे दीड दशकापासून शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरू आहे. मागील वर्षी सन २०१५ मध्ये महाराष्ट्रात सर्वांत जास्त म्हणजे ३२२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आर्थिक विवंचनेत, तणावाखाली असलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो, हे अनेक अहवालातून स्पष्ट झाले आहे. यावर उपाय म्हणून केंद्र-राज्य शासनाच्या विशेष योजना, मदत, पॅकेजेसही देण्यात आली, मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत.

या मातीसाठी व मातीमध्ये कष्ट करणारा, या जमिनीचा मालक जर याच मातीत घाम गाळून जगाला पोसत असेल, जगाची खळगी भरत असेल आणि याच कष्टकरी शेतकऱ्याला स्वत:च्या पोटाची खळगी भरण्यासाठी जर भाकर मिळत नसेल तर आपल्याच बांधावरच्या वाळलेल्या झाडाला, आपल्याच बैलाच्या कासऱ्याने, गळफास लावून घेण्याची जर वेळ येत असेल तर यापेक्षा या देशाचे मोठे दुर्दैव काय असू शकेल?

**शेतकरी आत्महत्या या समस्येचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी व ही समस्या कमी करण्यासाठी त्याला अध्यात्माची जोड देता येईल का? हे जाणून घेण्यासाठी आपल्या संस्थेद्वारे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांची थेट संपर्क साधून या विषयी अभ्यास करण्यात आला.** या अभ्यासासाठी / प्रकल्पासाठी नाशिक जिल्ह्यातील कायम दुष्काळी असलेला अशा देवळा तालुक्याची निवड केली. शेती व शेतकऱ्यांच्या समस्यांशी निगडीत अशा २५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. देवळा तालुक्यातील १०० शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून प्रश्नावली विषयी चर्चा करून सर्व १०० शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. प्रश्नांची उत्तर हे होकारार्थी किंवा नकारार्थी द्यायचे होते. हा प्रश्न शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये या अभ्यासाविषयी खूप उत्सुकता दिसून आली व म्हणून त्यांनी या कामासाठी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केले.

अशाप्रकारे १०० शेतकऱ्यांची मुलाखत घेऊन त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेऊन, तयार झालेला डेटा (माहिती) संकलित करण्यात आला आणि निष्कर्ष काढण्यात आले. त्या निष्कर्षांविषयी माहिती थोडक्यात खालील प्रमाणे देत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे ढोबळ

मानाने खालील कारणे दिसून आली.

१. नैसर्गिक आपत्ती - अवेळी व अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, रोग किडींचा हल्ला वगैरे.
२. योग्य शेतीमाल विक्री व्यवस्थापनेचा अभाव.
३. शेतीमाल विक्रीत सतत होणारी फसवणूक व लूट.
४. शेत मालाला योग्य दर न मिळणे.
५. कुटंबातील ताणतणाव, जुन्या व नव्या पिढीतील संघर्ष, अंधानुकरण, पती-पत्नीतील भांडणे, शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचा अभाव, कृषि शिक्षणाचा अभाव वगैरे.
६. सरकारी व्यवस्थेचा कटु अनुभव उदा. बँक, सोसायटी, तलाठी, तहसिल कार्यालय इ. ठिकाणी येणारे कटु अनुभव.
७. आर्थिक कारणे :- अपूर्ण / त्रासदायक व खर्चिक कर्ज वितरण / आर्थिक खर्चाचा ताळमेळ न बसणे त्यामुळे सततचा तोटा आर्थिक कोंडी, परिणामी बँक कर्ज / सावकारी कर्ज थकबाकी.
८. वरील सर्व कारणांमुळे शेतकरी तणावग्रस्त होऊन व्यसनाधीन होतो.

**वरील सर्व कारणांमुळे शेतकरी हतबल होतो, कर्जबाजारी होतो, व्यसनाधीन होतो, मनोबल खचते, आत्मविश्वास डगमगतो, सकारात्मक विचारांऐवजी नकारात्मक विचार मनात घर करतात आणि शेवटी आत्महत्येचा मार्ग धरतो.** शेतमजूर कधीही आत्महत्या करतांना दिसत नाही किंवा शेतकरी पतीच्या आत्महत्येनंतर त्याच्या पत्नीने आत्महत्या केली असे ऐकिवात नाही, मग शेतकरीच का आत्महत्या करतो हा महत्त्वाचा व चिंतनाचा विषय आहे.

हा अभ्यास / प्रकल्प हाती घेण्यामागे उद्देश असा आहे की, अध्यात्माद्वारे शेतकरी आत्महत्यासारख्या समस्यांची तीव्रता कमी करता येईल का? या संदर्भात प्रश्नावलीमधील अध्यात्माशी निगडीत काही प्रश्नांना मिळालेल्या उत्तरांमधून काही सकारात्मक तथ्ये आढळून आली ती खालील प्रमाणे.

१) अध्यात्माबद्दल काही माहीत आहे का? ह्या प्रश्नाला उत्तर देताना, ४१% शेतकऱ्यांना अध्यात्माविषयी माहित नाही असे आढळून आले. अध्यात्माद्वारे नक्कीच या शेतकऱ्यांचे सशक्तीकरण होऊ शकतं. राजयोगाची ओळख करून देऊन आपण त्यांना आंतरिक सशक्त करू शकतो व त्यांचे मनोबल वाढवू शकतो.

२) दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना असे आढळून आले आहे की, ३४% शेतकऱ्यांना असे वाटते की, सर्व समस्यांपासून मुक्त होण्यासाठी आत्महत्या हाच पर्याय आहे. ३४% म्हणजे खूप मोठा वर्ग आहे की, अशा शेतकऱ्यांना राजयोगाच्या अभ्यासाद्वारे समुपदेशन करून त्यांचे मनोबल / आत्मविश्वास वाढवून त्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करू शकतो. अध्यात्माद्वारे त्यांच्या मनात आलेल्या नकारात्मकतेला बदलणे शक्य आहे.

३) व्यसनाधीनतेविषयी विचारले असता - ६१% शेतकरी असे मानतात की, व्यसनाधीनता आत्महत्या करण्यास पूरक ठरते. राजयोगाच्या अभ्यासाद्वारे व्यसनाधीन शेतकऱ्यांचे समुपदेशन करून त्यांना व्यसनापासून परावृत्त करून, पर्यायाने आत्महत्या करण्यापासून परावृत्त करू शकतो. या संदर्भात ब्रह्माकुमारी संस्थेद्वारा यशस्वी प्रयोग झाले आहेत.

४) अध्यात्मामुळे शेतकऱ्यांचे मनोबल / आत्मविश्वास वाढेल का? या प्रश्नाला उत्तर देतांना ७६% शेतकरी या मताशी सहमत आहेत की, अध्यात्मामुळे शेतकऱ्यांचे मनोबल / आत्मविश्वास वाढेल या गोष्टीचा फायदा घेऊन, किसान सशक्तीकरणाच्या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना समुपदेशन करून, त्यांचा आत्मविश्वास वाढवता येणं शक्य आहे.

**५) याच संदर्भात पुढच्या प्रश्नाला उत्तर देतांना असे आढळून आले की, ९८% शेतकरी असे मानतात की, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास / मनोबल वाढल्यास आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊ शकते. म्हणजेच त्यांना अध्यात्मातून योग्य दिशा देऊन, मनोबल वाढविल्यास आत्महत्येचे प्रमाण कमी होऊ शकते. ९८% म्हणजे जवळजवळ सर्वच शेतकरी या मताशी सहमत आहेत.**

६) सेंद्रीय / यौगिक शेतीच्या उपयुक्तेबद्दल विचारले असता ९३% शेतकरी मानतात की, रासायनिक शेतीऐवजी सेंद्रीय / यौगिक शेती केल्यास खर्चात मोठी बचत होऊन शेतकरी कर्जबाजारी होणार नाही आणि पर्यायाने आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. ब्रह्माकुमारी संस्थेद्वारा यौगिक शेती विषयी यशस्वी प्रयोग केले आहेत.

७) निवडलेल्या शेतकऱ्यांना आंतरिक मुल्यांविषयी विचारले असता, असे निदर्शनात आले की, फक्त १९% शेतकऱ्यांना आंतरिक मुल्यांबद्दल माहिती आहे. म्हणजेच ८१% शेतकऱ्यांना राजयोगाच्या अभ्यासाद्वारे आंतरिक मुल्यांची ओळख करून देऊन त्यांना आंतरिक सशक्त करणे शक्य आहे.

८) 'पिस ऑफ माईंड' चॅनल बघण्याविषयी विचारले असता, फक्त ८% लोक हे चॅनल बघतात. ग्रामीण भागातील

आपल्या सेवाकेंद्राद्वारे जनजागृती करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या चॅनलशी जोडता येणे शक्य आहे, जेणेकरून त्यांचं आध्यात्मिक ज्ञान वाढेल.

९) शेतकरी सशक्तीकरण अभियानात सहभागी होण्याविषयी विचारले असता, खूप मोठा शेतकरी वर्ग म्हणजे ९५% शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर मोहिम हाती घेतल्यास, त्यात उत्स्फुर्तपणे सहभागी होण्यास तयार आहेत.

**वरील सर्व मुद्दे लक्षात घेता असं वाटतं की, आवश्यकता आहे ती आध्यात्मिक क्रांतीची, ज्याद्वारे त्यांचा नैतिक, आर्थिक, सामाजिक, चारित्रिक विकास होईल. आध्यात्मिकतेमुळे स्वच्छ व सकस विचार निर्माण होतात. स्वच्छ अर्थात शुद्ध व सकारात्मक विचारांमुळे क्रोध, नैराश्य, ईर्ष्या आदी मानसिक अस्वच्छता संपवून पवित्रता, दिव्यता, आशावादीपणा, हिंमत, उमंग, उत्साह, आत्मविश्वास यासारख्या मुल्यांच्या जागृतीद्वारा मनोबल (will power) वाढते आणि त्यामुळे आत्महत्यासारख्या टोकाचा विचार करणारे शेतकरी त्यापासून परावृत्त होऊ शकतात.**

आपणांस जाणून अत्यंत आनंद होईल की परमपिता शिव परमात्म्याच्या प्रेरणेने, ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या ग्राम विकास प्रभागाने स्वच्छ, स्वर्णिम, सशक्त भारत निर्मितीसाठी समस्त भारत देशात अखिल भारतीय किसान सशक्तीकरण अभियानाचे आयोजन केले होते. १३ सप्टेंबर, २०१५ या दिवशी देशाची राजधानी दिल्ली येथे केंद्रीय कृषीमंत्री यांचे हस्ते उद्घाटन केल्यावर खूप उमंग




उत्साहात देशातील २५ राज्यात व १२५ ठिकाणी संपूर्ण देशात वैचारिक क्रांती वा आध्यात्मिक क्रांतीसाठी सुरू केलेल्या ह्या अभियानाच्या निमित्ताने संस्थेतील राजयोगी भाऊ-बहिण गावागावात पोहोचून चौक सभा, पथनाट्य, प्रोजेक्टर शो ह्या माध्यमांनी शाश्वत - यौगिक शेती, शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी समुपदेशन केले. तसेच सरकारद्वारा शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली, जेणे करून त्यांचे मनोबल वाढेल व आत्महत्येच्या विचारापासून ते दूर राहतील.

या अभियानाचाच एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यातील देवळा (प्रकल्प अभ्यासासाठी निवडलेला तालुका) व सटाणा तालुक्यात २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान सटाणा व देवळा सेवाकेंद्राच्या बी. के. टीचर भगिनींच्या पुढाकाराने शेतकरी सशक्तीकरण अभियान राबविण्यात आले. व्यसन मुक्ती करण्यासाठी गावोगावी पथनाट्य सादर करण्यात आले. यौगिक शेती, राजयोगासंबंधी माहिती देण्यात आली. वरील कार्यक्रमास महिला व गांवकऱ्यांनी खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. बऱ्याचशा शेतकरी बंधुंना समुपदेशनाद्वारे व्यसनमुक्त होण्याचा सल्ला दिला व त्यांनी तत्क्षणी व्यसन सोडण्याचे जाहीर केले. आध्यात्मिक सशक्तीकरणाद्वारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्यास मदत होऊ शकते; हे वरील अभियानाद्वारे प्रत्यक्ष अनुभवास आले.

सारांशाने, व्यसनाधीनता, कर्ज-बाजारीपणा व तणाव यामुळे शेतकरी नकारात्मक विचार करतो आणि त्यातून त्याची बुद्धी भ्रष्ट झाली की, त्याची बुद्धी त्याला चुकीचा निर्णय देते. त्यामुळे त्याच्या हातून चुकीचे कर्म घडणे साहजिक शक्य होते. बुद्धीने निर्णय दिल्यावर त्याची कार्यवाही इंद्रियांद्वारेच होते. इंद्रियांवर अनुशासन नसले तर त्यामुळे आत्महत्यांसारख्या अनुचित गोष्टी घडतात. ज्यावेळी शेतकऱ्यांच्या मनात आत्महत्या करण्याइतका टोकाचा विचार येतो, त्यावेळेस जर त्याची बुद्धी आध्यात्मिक शक्तीद्वारे सशक्त असेल, तर त्याच्या मनात सकारात्मक संकल्प जागृत होऊन, आलेल्या नकारात्मक विचारांवर मात करून त्याची आत्महत्या टळू शकते. आंतरिक सशक्तीकरणच बाह्यसशक्तीकरणाचा आधार आहे ज्यातून अशा महत्त्वाच्या वेळेस मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते.

**वेद-शास्त्रांमध्ये असे म्हटले गेले आहे की, 'आत्म-घात (अथवा आत्म-हत्या) हे महापाप आहे. याचे कारण ही अगदी सहज सोपे आहे, स्पष्ट आहे.**

**मुळत: निसर्ग-नियमांच्या विरोधात केलेले कोणतेही कार्य हे पापकर्म, दुष्कर्म वा विकर्म मानले जाते.** आपणां सर्वांना हे ज्ञातच आहे की, मनुष्यात्मा अजर - अमर - अविनाशी आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत देखील म्हटले आहे की, मनुष्यात्म्याला कोणतेही शस्त्र तोडू शकत नाही, वारा सुकवू शकत नाही, पाणी ओले करू शकत नाही, अग्नि जाळू शकत नाही. मनुष्यात्मा ही एक आधिभौतिक अक्षय उर्जा आहे, अमीट शक्ती आहे. मनुष्यात्मा अजन्मा आहे, अमर आहे अर्थात मनुष्यात्मांना ना ही कोणी जन्माला घातले आहे आणि ना ही कोणी त्यांचा नाश करू शकतो.

निसर्ग-नियमानुसार जर एखाद्या मनुष्यात्म्याचा जीवनप्रवास हा ७० वर्षांचा आहे आणि त्या मनुष्यात्म्याने शारीरिक वयाच्या ४० व्या वर्षी जीव-घात केला तर त्या मनुष्यात्म्याला पुढील ३० वर्ष शरीर प्राप्त होत नाही अर्थात् मातेच्या गर्भाद्वारे जन्म मिळत नाही. तसेच निसर्ग-नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल झालेल्या हा महापापकर्माचे भोग भोगावे लागणार ते वेगळेच. तेव्हा जो कोणी जीव-घात करतो, तो संसारिक जबाबदारीतून मुक्त न होता, अधिकच महापापकर्माचा भागीदार होतो. हे अमीट सत्य न केवळ शेतकऱ्यांनी परंतु सर्वांनीच आपल्या मन-बुद्धीत कोरून ठेवले पाहिजे, जेणेकरून अशा महापापकर्मापासून आपण दूर राहू.

वरील सर्व बाबी लक्षात घेता एनजीओ, प्रशासन व आध्यात्मिक संस्थांनी एकत्र येऊन विशेष अभियानाद्वारे शेतकऱ्यांचे सशक्तीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेतला तर शेतकरी आत्महत्या कमी करण्यास नक्कीच मदत होईल. **मागील वर्षी ब्रह्माकुमारी संस्थेद्वारे चालविलेले किसान सशक्तीकरण अभियान यशस्वी झाले आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागातील अर्थकारण शेतीवर अवलंबून असून, शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. म्हणूनच शेतकरी वाचला तर देश वाचेल. शेतकऱ्यांत सकारात्मकता आणणे ही काळाची गरज आहे.'**

■

---

# ज्ञान आणि दान

**ज्ञानात असावी आत्मियता ।**
**दानात असावी गुप्तता ।।१।।**
**चर्चा ज्ञानाची करावी।**
**दानाची कधी न करावी ।।२।।**
**ज्ञानदान असे श्रेष्ठ दान ।**
**यज्ञासाठी धनदान अति मूल्यवान ।।3।।**
**ज्ञान मिळे आम्हा पृथ्वीमोलाचे ।**
**दान का करावे कवडी मोलाचे? ।।४।।**
**जसे ज्ञानदान तसे करा धनदान ।**
**तेणे होईल सहज आत्मकल्याण ।।५।।**
**मन करा हो निर्मळ, निर्मळ !**
**दान ही करा सढळ सढळ!! ।।६।।**

**- ब्र.कु. दशरथ भाई, देवळा (मालेगाव)**

---

पान २३ वरून दैवी स्वराज्यासाठी भिन्न-भिन्न पदाधिकारी निर्माण करण्याचे उत्तरदायित्व भारतमाता शिवशक्तींचे आहे. असे पदाधिकारी निर्माण करून सत्ययुगी दैवी समाजाचे व्यवस्थापन करण्याची सेवा त्यांनी आतापर्यंत केलीच आहे. त्याचबरोबर स्वर्ग बनणाऱ्या भारतभूमातेची ही सेवा केली आहे. ह्या महान सेवेच्या फलश्रुतीत भारत पुनश्च वैभवशाली 'सोनेकी चिडियाँ' बनणार आहे. त्या वैभवशाली सुवर्णभारताचे ज्ञानी तू आत्म्याने बनवलेले व गायिकेनेही तितक्याच समर्पक आवाजात म्हटलेले पुढील गीत श्रवण करताना त्या स्वर्गीय भारताविषयी, रचयिता परमात्म्याविषयी व त्याच्या श्रेष्ठ रचनेविषयी मनात एक उदात्त भावना निर्माण होते. ह्या लेखाच्या निमित्ताने त्या मनभावन स्वर्गीय गीताचे मनन-चिंतन करताना, त्या होवनहार स्वर्गात मन बुद्धीने रमण करूया. असे सत्ययुगी स्वर्गात रमण करणे म्हणजे त्या स्वर्गातील आपले देवत्वपद फिक्स करण्यासारखे आहे. असे फिक्स केलेले देवत्व पद कल्प-कल्प प्राप्त होईल हे सांगण्याची आता आवश्यकताही नाही. आता केवळ अत्यंत शांतपणे 'भारत देशकी महिमा महान,' ह्या महान गीताचे मनन चिंतन करूया.

**भारत देश की महिमा महान, इसमें आते शिव भगवान ।**
**जग का है ये तीर्थ स्थान, परमपिता का जन्मस्थान ।।**
**सतयुग में सोने की चिडियाँ, यही भारत कहलाता था**
**सर्व गुणों से पूर्ण मनुष्य, देवी देव कहलाता था....**

■

पान १५ वरून sufficient for the greed of the people." म्हणजे आवश्यक तेवढे धन लोकांना प्राप्त होते. परंतु त्यांच्या लोभाची कधी तृप्ती होत नाही. अशी ही एक म्हण हिंदीमध्ये आहे की, ''भगवान भूखे पेट उठाता है, लेकिन भूखे पेट सुलाता नहीं!'' लोभसुद्धा पाच विकारांमधील एक महत्त्वाचा विकार आहे. म्हणून म्हटले जाते की, आपल्याला कुठे व किती धन खर्च केले पाहिजे, यावर लक्ष ठेवायला पाहिजे.

जितके धन आपण ईश्वरीय सेवेत सफल करू. तितके आपले भाग्य बनू शकेल. शंकराचार्यांनी संस्कृतमध्ये लिहिले आहे की धन, जमीन, पशू इ. सर्व काही इथेच राहतील. जेव्हा तुम्ही शरीर सोडाल, तेव्हा पशू तबेल्यामध्येच राहतील. पत्नी निरोप देण्यासाठी केवळ अंगणापर्यंतच येईल, मित्र संबंधी स्मशानापर्यंत येतील. परंतु या पुढील प्रवास तर तुम्हाला एकट्यालाच करायचा आहे. शंकराचार्य प्रश्न करतात की, पुढील सफल प्रवासासाठी तुम्ही काय केले आहे? ग्रीक तत्त्वज्ञानी म्हणतात की, वर्तमानामध्ये आम्ही भूतकाळात केलेल्या कमाईच्या आधारावर खात आहोत. परंतु आता वर्तमानकाळात आम्ही भविष्यासाठी जर काही बचत केली नाही, तर भविष्यात उपाशी रहावे लागेल.

चौदाव्या शतकातील पोपच्या काळात, एखादा मनुष्य मृत्यू पावल्यास, ते म्हणत की, तुम्ही इतके रूपये दान द्या. मग आम्ही ईश्वराला चिठ्ठी लिहू की तितक्या रूपयांचे त्यांचे प्रारब्ध बनवा. मग त्यात काटछाट घेऊन असे म्हटले जाऊ लागले की, तुम्ही ९० रू. द्या. तर तेथे तुम्हाला १०० रू. मिळतील. नंतर मग ८० रू., ७० रू., ६० रू. पर्यंत सूट आली. नंतर पुढे लोकांनी धर्मनेत्यांवर विश्वास करणेच सोडून दिले. याच गोष्टींवरून रोमन कॅथालिक धर्मामध्ये मतभेद झाले आणि नंतर त्यातून प्रोटेस्टंट शाखेची स्थापना झाली.

**ब्रह्माबाबा जेव्हा मुलांना पत्र लिहित असत, तेव्हा पत्राच्या कोपऱ्यामध्ये मातेश्वरीजी देखील आपले विचार लिहित आणि यादप्यार देत असत. तेव्हा मी त्यांना म्हणायचो की, तुम्ही असं का लिहिता? तेव्हा त्या म्हणाल्या की, मी मुलांना काटकसर कशी करायची, ते शिकवित आहे. यामध्ये वेगळा कागद खर्च करायची आवश्यकता पडत नाही. अशा प्रकारचा काटकसरीचा सिद्धांत मला मातेश्वरींनी शिकविला. तो मी तुम्हाला सांगत आहे. तात्पर्य म्हणजे, आपले तन-मन-धन अधिकाधिक बचत करून बाबांच्या कार्यात सफल करता आले पाहिजे.**

**(भावानुवाद : ब्र. कु. जयश्री, विक्रोळी, मुंबई)** ■

---

पान २४ वरून व विशेषता यांचा विचार करत असतो. त्यामुळे जीवनातील प्रत्येक संघर्ष हा त्याच्या जीवनातील उत्कर्ष बनत जातो. त्याला कुठल्याही परिस्थितीत सफलता प्राप्त होते. **याला मुख्य कारण म्हणजे सकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, हिंमत, चिकाटी, कार्यकुशलता इत्यादी गुण आपोआपच येत जातात. फलस्वरूप त्याचे जीवन सदा सफलता संपन्न बनत जाते.** त्यामुळे सध्याच्या या संघर्षमय जीवनात सकारात्मक विचारांची खरी गरज आहे.

## सकारात्मक विचारांचे अनन्य साधारण महत्त्व

महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे कौरव आणि पांडव यांचे जीवन जेव्हा संघर्षमय बनले. तेव्हा श्रीकृष्णाने त्यांना गीता ज्ञानाच्या रूपाने, सकारात्मक विचारांचे धडे शिकवले. परंतु कौरवांनी त्यांचे मत ऐकले नाही. तसेच स्वत:मध्ये बदल घडवून आणला नाही. एवढंच नव्हे तर त्यांनी नकारात्मक गोष्टींचा सहारा घेतला. परिणामी ते जीवनात असफल ठरले. याउलट पांडवांनी सकारात्मक विचारांची सोबत केली. ते श्रीकृष्णांच्या मताप्रमाणे चालले. कौरवांच्या प्रत्येक नकारात्मक व्यवहारातून सुद्धा त्यांनी काही ना काही धडे घेतले. फलस्वरूप शेवटी सफल अथवा विजयी बनले. **त्याचप्रमाणे वर्तमान संगमयुगात स्वयं परमपिता शिव परमात्मा, या सृष्टीवर अवतरित होऊन, मागील ८० वर्षापासून सध्याच्या संघर्षमय जीवनामध्ये सफल बनण्यासाठी, ईश्वरीय श्रीमताच्या रूपाने मार्गदर्शन करीत आहे. त्यासाठी आपल्याला ईश्वरीय विद्यार्थी (Godly Student) बनून, त्यांची शिकवण आचरणात आणायची आहे. परिणामत: आपल्या जीवनातील समस्या वा संघर्ष, समाधान स्वरूपात परिवर्तित होईल. त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की ईश्वरीय ज्ञान मुरली ही सकारात्मक विचारांचा अपार खजिना आहे. तीचे नियमित श्रवण, वाचन व त्यानुसार आचरण केल्याने, आपले जीवन सदा शांतीपूर्ण, सुखमय व दैवीगुण संपन्न बनेल.** ■



# उपकार तुम्हारा बाबा.. (अनुभव)

- ब्र.कु. उल्का देशमुख, फोंडा, गोवा.

मी गेल्या ९ वर्षापासून परिवारसहित ज्ञानमार्गांत आहे. आम्ही ज्ञानमार्गात कसे आलो; तो प्रसंग आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. आम्ही एके दिवशी टीव्ही वरती आस्था चॅनल सुरू केला. **त्यावेळी 'अवेकनिंग विथ ब्रह्माकुमारीज्' हा कार्यक्रम सुरू होता. त्या कार्यक्रमातील बी.के. शिवानी बहेनजीचे पुढील एक वाक्य कानी पडले. ते म्हणजे 'भगवान इस सृष्टीवर आ चुके है और मनुष्य को देवता बनाने का कार्य कर रहे है।' त्यांच्या ह्या एका वाक्याने मनावर जादू केली.** सकाळ होताच मी व माझे पती ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रावर गेलो व तेथे आम्ही साप्ताहिक कोर्स पूर्ण केला. सेवाकेंद्रावरील बहेनजींचे वागणे व तेथील वातावरणामुळे आम्ही अगदी मोहित झालो. त्यानंतर माझ्या दोन्ही मुलांनी देखील राजयोगाचा कोर्स पूर्ण केला. अशाप्रकारे प्राणेश्वर शिवबाबांनी माझ्या परिवाराची निवड केली होती, याचा मला फार आनंद झाला होता. आम्ही सर्वजण मुरली क्लाससाठी सेवाकेंद्रावर नियमित जाऊ लागलो.

सहा वर्षापूर्वी जीवनात अचानक एक परीक्षा आली. माझ्या पतीला कावीळ झाली व त्यामुळे पोटात इन्फेक्शन झाले. डॉक्टरांनी त्वरीत ऑपरेशन करावे लागेल; असे सांगितले. त्यासाठी आम्ही गोव्याहून पुण्याला आलो व ३१ डिसेंबर २०१० रोजी मंगेशकर हॉस्पिटलमध्ये पतीला ॲडमिट केले. चार दिवसानंतर ऑपरेशन करायचे ठरले. एवढ्यात माझे पती म्हणू लागले की मला सतत डोळ्यांपुढे दुतर्फा सफेद वस्त्राधारी रांगेत उभे असल्याचे दृश्य दिसत आहे. त्यामुळे तू येथील भागात असलेल्या ब्रह्माकुमारी सेंटरचा शोध घे व माझ्यासाठी सेंटरवरून शिवबाबांचे पवित्र जल घेऊन ये. मला काय करावे हे सुचेना कारण मला तेथील काहीच माहिती नव्हती. कसेबसे मी दोन दिवस चाल-ढकल केली. परंतु ते काही ऐकेनात. त्यांनी ध्यासच घेतला होता. मग मी आमच्या गोव्याच्या बहेनजींना फोन करून विचारले तेव्हा त्यांनी मला एरंडवणा भागातील सेंटरचा फोन नंबर दिला. मग मी त्या बहेनजींना फोन केला व सर्व हकीकत सांगितली सेंटरवर कसे यायचे, वगैरे विचारले. त्यानंतर शिवबाबांची मदत सुरू झाली.

दहा मिनिटांनी त्याच बहिणीचा मला फोन आला व त्या म्हणाल्या की आज गुरूवार आहे. त्यामुळे मी स्वत:च भोगाचे जल घेऊन हॉस्पिटलमध्ये येते. तुम्ही पेशंटजवळच थांबा. त्याचबरोबर मी तुमच्यासाठी ब्रह्माभोजन सुद्धा घेऊन येईल. हे ऐकून फार आनंद झाला. मनोमन मी बाबांचे आभार मानले. थोड्या वेळाने त्या बहेनजी आल्या. सफेद वस्त्र परिधान केलेल्या व श्री लक्ष्मी-नारायणाच्या बॅच लावलेल्या, प्रसन्नमूर्त बहिणीला पाहून सर्वांना लाइट व माइट मिळत होता. हॉस्पिटलच्या सातव्या मजल्यावर आमची रूम होती. बहेनजींना पाहून, ज्या-ज्या रूममध्ये बाबांची मुले होती, ते सर्वजण जमा झाले. सर्वांची मोठ्या प्रेमाने बहेनजींनी चौकशी केली. सर्वांना बाबांचा भोग (प्रसाद) दिला. सर्वांना दृष्टी दिली. सर्वांसाठी योगदान केले नंतर त्या परतल्या. त्यांच्या उपस्थितीत असा अनुभव आला की प्राणेश्वर बापदादा तसेच ब्राह्मण परिवार आपल्या बरोबर आहे.

ठरल्याप्रमाणे चार दिवसांनी ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले. रोज व्हिजीटसाठी एक लेडी डॉक्टर येत असे. त्यांनी एके दिवशी टेबलावर बाबांची पुस्तके पाहिली व त्या देखील म्हणाल्या की मी व माझी आई ज्ञानमार्गात चालतो. त्यामुळे त्या जेव्हा व्हिजीटला येत तेव्हा खूप बरे वाटायचे. त्यांचे ज्ञानमुक्त बोल मनाला धीर देत असत. एके दिवशी नवीन नर्स सेवेसाठी आली. तीने पण सांगितले की मी ओम् शांतीत जाते. ती मला रोज, बाबांची मुरली आणून देत असे. त्यामुळे ते हॉस्पिटलच्या ऐवजी मला 'होली स्थळ' अनुभवाला

आले. खरोखर प्रत्येक पावलावर बाबांच्या मदतीचा अनुभव आला. या अनुषंगाने पुढील गीताच्या ओळी मला स्मरतात-

**वो खुदा दोस्त है खिदमत में।**
**हाजीर है हजार भुजाओंसे।**

आता आम्ही दोन दिवसांनी डिस्चार्ज घेऊन, घरी परतणार होतो. तेवढ्यात माझ्या पतीच्या पोटातील एक स्टीच (टाका) लीक होत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे पुन्हा ऑपरेशन करणे, आवश्यक होते. परंतु पुन्हा ऑपरेशन करणं, ही गोष्ट सोपी नव्हती. कारण त्यासाठी पेशंटच्या मनाची तयारी असणं, अति आवश्यक असते. त्यामुळे डॉक्टरांनी स्वत: येऊन पेशंटला विचारले की ऑपरेशनसाठी तुमची तयारी आहे का? त्यावर माझे पती म्हणाले की माझी पूर्ण तयारी आहे. त्यानुसार दुसऱ्यांदा ऑपरेशन झाले व ते पूर्णत: यशस्वी झाले.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर माझ्या पतीला भेटण्यासाठी आले. तेव्हा त्यांनी विचारले की आपल्याला एवढी शक्ती कुठून आली. ज्यामुळे आपण दुसऱ्यांदा ऑपरेशन करण्यासाठी इतके सहज तयार झालात? त्यावेळी माझ्या पतीने उत्तर दिले की मला ही शक्ती परमपिता शिव परमात्म्यापासून प्राप्त झाली. दहा दिवसांनी माझे पती चांगले झाल्यावर, आम्ही घरी परतलो. नियमित सेंटरला जाऊ लागलो. माझ्या पतीची तब्बेत चांगली सुधारली. त्यानंतर त्यांनी मधुबनला जाऊन शिवबाबांना भेटायचा ध्यास घेतला. एकदा जायचे ठरवले परंतु



ट्रेनचे तिकीट मिळाले नाही. आम्ही शिवबाबांची इच्छा समजून गप्प राहिलो. परंतु त्याच ट्रेनला पुढे, रस्त्यात दरड कोसळून, अपघात झाला व लोकांना खूप त्रास झाला. यातून देखील आम्हाला शिवबाबांनी वाचवलं.

पुढे सहा महिन्यानंतर सन २०११ मध्ये डॉक्टर्ससाठी आयोजित सेमिनार साठी आम्ही मधुबनला गेलो. त्यावेळी आमच्याबरोबर मुलगी व जावई दोघे होते. त्याचवेळी मधुबनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम होता. त्यावेळी दीदींनी आम्हा चौघांना पावन रक्षासूत्र बांधले. याचा आम्हाला खूप आनंद झाला. शेवटच्या दिवशी मी, माझी मुलगी व जावई आम्ही तिघेजण फिरायला गेलो. त्यावेळी माझे पती आमच्या बरोबर न येता, बाबांच्या झोपडीतच योग करीत बसले. आम्ही पाच वाजता परत आलो तर ते तेथेच बसले होते. आम्ही त्यांना विचारले की तुम्ही दुपारी भोजन वगैरे केले का? **तेव्हा ते म्हणाले की, ''दुपारी पिताश्री ब्रह्माबाबा माझ्यासाठी फळे घेऊन आले होते. (अर्थात त्यांना तसा साक्षात्कार झाला होता.) त्यांच्या हातातील फळांची परडी एवढी सुंदर होती की अजूनही ती माझ्या डोळ्यासमोरून जात नाही. फळे एकदम ताजी व अतिशय मधुर होती. पिताश्रींचा ड्रेस लाइट सारखा चमकत होता. त्यांनी मला मोठ्या प्रेमाने फळे खाऊ घातली. म्हणून मला भूक लागली नाही. पिताश्री आतापर्यंत माझ्याजवळच बसले होते. ते म्हणाले की तू काही चिंता करू नकोस. सर्व काही ठीक होईल. मी आहे तुझ्याबरोबर.''**

दुसरे दिवशी आम्ही ट्रेनने परतीच्या प्रवासाला निघालो. त्यादिवशी सर्व काही ठीक होते. प्रवास चालू असतांना गुरुवारी दि. ११/८/२०११ रोजी अमृतवेळेला योग करण्यासाठी मी जागेवर उठून बसले होते. थोड्या वेळाने माझे पती देखील जागे झाले. **ते सुद्धा योगासाठी बसले. ५ मिनिट योग केल्यानंतर त्यांनी आपले दोन्ही हात दोन्ही भुवयांच्या मध्ये ठेऊन, नमस्ते केले व 'ओम-शांती शिवबाबा' असे शब्द उच्चारले. लगेचच त्यांचे हात एकदम खाली आले.** तेव्हा मी उठून, त्यांची नाडी पाहिली. तर नाडी बंद झाली होती. श्वासही थांबला होता. त्या आत्म्याने देहत्याग करून, शिवबाबांची गोद घेतली होती. आयुष्याचे शेवटचे क्षण बाबांच्या मधुबनमध्ये व्यतित केले होते. मधुबनमधील चार धाम करण्याची त्यांची इच्छा पूर्ण झाली होती. मी मुलांना जागे केले व त्यांना ही घटना सांगितली. ट्रेनमध्ये आसपास सर्वजण अगदी गाढ झोपले होते. कुणाला काही समजले नाही. डब्यात एकदम शांतता पसरली होती. त्यावेळेस शिवबाबांनी माझ्यात खूप शक्ती भरली. माझी

स्थिती शांतीपूर्ण, साक्षी, द्रष्टा होती. ती पाहून मुले पण शांत झाली. पुढे पाच तासांचा प्रवास आम्ही बाबांच्या आठवणीत राहून पार केला. कोठेही कसली अडचण अथवा व्यत्यय आला नाही. बाबांच्या स्मृतीतच आम्ही घरी पोहोचलो. माझ्या पतींना तर प्राणेश्वर बापदादांनी साक्षात्काराद्वारे जणू आदल्यादिवशीच पूर्वकल्पना दिली होती व त्यानुसार आत्मारूपी पक्षी सद्‌गुरूवारी अमृतवेळेला वतनमध्ये उडाला होता - हाच सुंदर भाव पुढील काव्यपंक्तीत आहे -

**पंछी रे, उड जा, प्यारे वतन में, अम्बर के उस पार ।**

**बडे प्यार से, भरे भाव से, जा बाबा के अंतर्द्वार ।।**

गुरूवारी सकाळी सर्व सेवाकेंद्रावर प्राणेश्वर बापदादांना भोग लागण्यापूर्वी माझ्या पतीचा आत्मा वतनमध्ये पोचला होता, बापदादांकडून असीम प्रेम प्राप्त करण्यासाठी, बापदादांच्या हातून भोगाचे जल प्राशन करण्यासाठी, बापदादांच्या हातून भोग स्वीकार करण्यासाठी; त्यांच्या स्नेहमय गोदीत सामावून जाण्यासाठी, सद्‌गुरू शिव परमात्म्याशी परमपावन मिलनाचा अविनाशी अनुभव करण्यासाठी! खरंच जीवन यात्रा संपावी ती अशी ! 'ओम शांती शिवबाबा!' आत्मिक बंधुनो, आपण खरोखर किती भाग्यवान आहोत की स्वयं भगवान आपला साक्षी आहे-

**ऐसा साथी किसका होगा,**
**ये सोच आँख भर आती है।**
**भगवान हमारा साथी है...!**

■

---

## ब्रह्मातनी शिव घेती अवतार

**नवसृष्टी स्थापन करण्या, ब्रह्मा हेचि आधार ।**
**ब्रह्मातनी शिव घेती अवतार ।।धृ।।**
**संगमयुग अति महान ठरले**
**परमपित्याचे अवतरण झाले**
**जन्म एकवीस, भाग्य देऊनी करिती पतितोद्धार**
**ब्रह्मातनी शिव घेती अवतार ।।१।।**
**ईश्वरीय विश्व विद्यालय स्थापिले**
**सकळा राजयोगाचे शिक्षण दिधले**
**परमपिता शिव, मुलांसाठी उघडी स्वर्गाचे द्वार**
**ब्रह्मातनी शिव घेती अवतार ।।२।।**
**दिव्य गुणांनी बनू देवगण**
**होऊ कृष्णासवे गोपी-गोपगण**
**झुलवी परमात्मा हिंदोळा, निशीदिनी हळूवार**
**ब्रह्मातनी शिव घेती अवतार ।।3।।**

**-ब्र.कु. वसंतभाई निंबाळकर, कागल (कोल्हापूर)**

## शांती अमोल आहे, शृंगार जीवनाचा

**शांती अमोल आहे, शृंगार जीवनाचा ।**
**ही दिव्य देण दैवी, करी देव मानवाचा ।।धृ।।**
**आनंद, प्रेम, करुणा, करी श्रेष्ठ जीवनाला ।**
**तू ध्यास या गुणांचा, लावी तुझ्या मनाला ।**
**हे गुण त्यास लाभे, शांती स्वभाव ज्याचा ।**
**ही दिव्य देण दैवी, करी देव मानवाचा ।।१।।**
**दुर्भावना मनाची, वाल्यास जन्म देई ।**
**सत्संग लाभता तो, ऋषि वाल्मिकीच होई ।**
**स्वीकार तू करावा, अनमोल सद्‌गुणांचा ।**
**ही दिव्य देण दैवी, करी देव मानवाचा ।।२।।**
**सकळास मोहवी हे, पावित्र्य देवतांचे ।**
**ते पूजनीय नित्य, आहे युगा-युगांचे ।**
**''राहीन मी पवित्र'' निर्धार कर मनाचा ।**
**ही दिव्य देण दैवी, करी देव मानवाचा ।।3।।**

(आधार: दिवंगत ब्र.कु. गौतम सुत्रावे यांनी रचित काव्यसंग्रह 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची')